सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ०८ एप्रिल २०२५ वर्ष तिसरे अंक ०७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दिव्यांगांच्या रोजगारासाठी धोरण आणणार : मुख्यमंत्री फडणवीस

## दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन योजना, धोरणांची निर्मिती करावी, विशेष सहाय्य योजनेचे अर्थसहाय्य डीबीटी प्रणालीद्वारे जमा, घरकुलासाठी स्वतंत्र योजना

मुंबई : जन्मजात किंवा काही कारणास्तव दिव्यांगत्व आलेल्या दिव्यांग बांधवांना आयुष्य जगत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दिव्यांगत्वावर मात करीत आपल्या जीवनात उत्कर्षाचा मार्ग शोधावा लागतो. अशा दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात समृद्धी निर्माण करण्यासाठी काल सुसंगत नवनवीन योजना, धोरणांची निर्मिती करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या धोरणांची योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित होते.

दिव्यांगाच्या रोजगारासाठी धोरण

राज्यातील दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. दिव्यांगाच्या रोजगाराकरिता धोरण तयार करण्यात येणार असून रोजगार व स्टॉल बाबतचे धोरण तयार करण्याचे निर्देश कौशल्य विकास व उद्योग विभागाला दिले आहे.

लाडकी बहीण योजनेप्रमाणे दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य बँक खात्यात जमा होणार

राज्यातील दिव्यांग बांधवांना अधिक सुलभतेने लाभ मिळावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, लाडकी बहीण योजनेप्रमाणे दिव्यांग बांधवांचे अर्थसहाय्य



थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य वाढवण्याबाबतही शासन सकारात्मक असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी शासन सकारात्मक आहे.

विशेष सहाय्य योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण डीबीटी प्रणालीद्वारे

राज्यातील दिव्यांग नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष सहाय्य योजनेचे अर्थसाहाय्य थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. ज्या लाभार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक झाले नाही यासाठी जिल्हाधिकारी यांनी कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डीबीटी प्रणालीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

दिव्यांग सर्वेक्षण प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

दिव्यांग सर्वेक्षण व प्रमाणपत्रासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात यावी. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वाचं प्रमाणपत्र नसल्यामुळे शासकीय योजना, सवलती, शिक्षण, नोकरी आणि आरोग्यविषयक सुविधा मिळण्यासाठी अडचणी येतात. यासाठी आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाने दिव्यांग प्रमाणपत्र वाटपासाठी विशेष मोहीम राबवावी.

प्रत्येक विद्यापीठात दिव्यांगांसाठी स्वतंत्र व्यवस्था

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात सुलभ व सन्मानपूर्वक प्रवेश मिळावा यासाठी प्रत्येक विद्यापीठात दिव्यांगांसाठी स्वतंत्र व्यवस्था तयार करण्यात यावी. यामध्ये दिव्यांग अनुकूल पायाभूत सुविधा, सहाय्यक उपकरणे, विशेष मार्गदर्शन केंद्रे आणि समुपदेशन सेवा यांचा समावेश असावा. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत शासन सकारात्मक विचार आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रस्ताव तयार करून मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा.

अंत्योदय योजनेत दिव्यांगांचा समावेश

अंत्योदय अन्न योजनेत पात्र दिव्यांगांचा तातडीने समावेश केला जाणार असून, ज्यांचा समावेश विद्यमान निकषांमध्ये होऊ शकत नाही, अशा दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य शासन स्वतंत्र योजना तयार करणार आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाने पात्र दिव्यांग व्यक्तींना शिधापत्रिका वाटप करण्यात येत आहेत.

दिव्यांगासाठी जिल्हा वार्षिक योजनेत एक टक्का निधी

राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणाकरिता जिल्हा वार्षिक योजनेत सन २०२५-२६ पासून प्रत्येक वर्षी नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीमधून कमाल १ टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निधीमधून दिव्यांग व्यक्ती साठीच्या सर्व सोयी सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग भवन उभारण्यात येईल.

स्वतंत्र घरकुल योजना

दिव्यांग नागरिकांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्य शासन स्वतंत्र घरकुल योजना तयार करणार आहे. ज्यांच्याकडे स्वतःची जमीन नाही, अशा लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी आवश्यक जागेसाठीही शासन मदत करणार आहे. दिव्यांग महामंडळाच्या माध्यमातून कर्जमाफी, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत शासकीय रुग्णालयात दर्जेदार औषधे मिळणे, दिव्यांगाच्या कायद्यानुसार प्रत्येक विभागाने दिव्यांगावर पाच टक्के खर्च करणे, प्रशिक्षण व स्वतंत्र क्रीडा स्टेडियम, अति तीव्र दिव्यांगाचे संगोपन, मानधन असलेल्या पदांमध्ये दिव्यांगाना प्राधान्य, जिल्हास्तरावर तालुकास्तरावर विविध समितीमध्ये दिव्यांग सदस्यांची नियुक्ती, राज्यस्तरावर दिव्यांगासाठी फेस्टिवलचे आयोजन करणे याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीस विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींचे २१०० कडे लक्ष!

मुंबई : महिलांना आर्थिक सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण योजना'अंतर्गत राज्य सरकारकडून दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. आतापर्यंत महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांना ९ हप्ते देण्यात आले आहेत. त्याचबरोबर सरकारने रक्कम वाढवून २१०० करण्याचे म्हटले आहे. त्यामुळे आता लाडक्या बहिणींचे एप्रिल महिन्याकडे लक्ष लागले असून यासंदर्भात महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेचा एप्रिलचा हप्ता महिन्याच्या अखेरीस येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ३० एप्रिल २०२५ रोजी अक्षय तृतीया आहे. त्यामुळे अक्षय तृतीयेच्या मूहूर्तावर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पैसे येतील, अशी माहिती समोर येत आहे. परंतु अद्यापही याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

लाडक्या बहिणींना २१०० कधी मिळणार?

महायुती सरकारने लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर आम्ही महिलांना २१०० देऊ, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. तर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जाहिरनामा हा ५ वर्षांसाठी असतो. या काळात आम्ही लाडक्या बहिणींना कधीही २१०० रुपये देऊ, असे म्हटले होते. त्यामुळे २१०० रुपये कधी येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भारतीय महिलांची समुद्र प्रदक्षिणा

मुंबई : भारताच्या भूदल, नौदल आणि हवाई दलामधून निवड झालेल्या १२ महिला समुद्र प्रदक्षिणेला निघाल्या आहेत. या भारतीय महिलांच्या पथकाला समुद्र प्रदक्षिणेसाठी नौदल वॉटरमॅनशिप प्रशिक्षण केंद्र, कुलाबा, मुंबई येथील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे (सीएमई) कमांडंट लेफ्टनंट जनरल ए.के. रमेश यांनी हिरवा झेंडा दाखवला. समुद्र प्रदक्षिणेला निघालेले भारतीय महिलांचे पथक मुंबई ते सेशेल्स आणि सेशेल्स ते मुंबई असा प्रवास करणार आहे. या प्रदक्षिणेच्या अनुभवाआधारे तयारी करुन २०२६ मध्ये भारतीय महिलांचे पथक आणखी एका धाडसी सागरी मोहिमेवर निघणार आहे.

भारताच्या बारा महिलांची समुद्र प्रदक्षिणा ही मोहीम सोमवार ७ एप्रिल २०२५ रोजी सुरू झाली. ही मोहीम ५५ दिवसांत पूर्ण केली जाईल. आयएएसव्ही त्रिवेणीवरून चार हजार सागरी मैलांचा प्रवास करुन महिलांचे पथक समुद्र प्रदक्षिणा ही मोहीम यशस्वी करणार आहे. समुद्र प्रदक्षिणा या मोहिमेत महिलांचे पथक लहरी हवामान, अस्थिर समुद्र, बदलते वातावरण, प्रतिकूल परिस्थिती, यांत्रिक आणि शारीरिक आव्हाने अशा अनेक समस्यांना




सामोरे जाणार आहे. या आव्हानांना लीलया पेलण्यासाठी खोल समुद्रात लवचिकता, बुद्धिमत्ता, संयम, धाडस, धैर्य आणि दृढनिश्चय यांचा कस लागणार आहे.

समुद्र प्रदक्षिणा ही मोहीम महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. तसेच राणी वेळू नाचियार, राणी दुर्गावती आणि राणी लक्ष्मीबाई सारख्या भारतातील महान योद्धा राण्यांना श्रद्धांजली अर्पण करणार आहे.

महिलांच्या समुद्र प्रदक्षिणा या ऐतिहासिक प्रवासाचा समारोप ३० मे २०२५ रोजी मुंबईत ध्वजारोहण समारंभाने होईल. नारी शक्ती ही कोणत्याही आव्हानावर मात करण्यास सक्षम असलेली एक अटळ शक्ती आहे यावर समुद्र प्रदक्षिणा मोहिमेच्या निमित्ताने पुन्हा एकदा शिक्कामोर्तब होणार आहे.

## अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाला शेअर बाजाराचा प्रतिकूल प्रतिसाद, जगभर मार्केट कोसळले

नवी दिल्ली : अमेरिकेने भारतासह जागातील अनेक देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या मालावर टॅरिफ लागू केला आहे. या निर्णयाचा जगभरातील शेअर बाजारांवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसत आहे. नव्या आठवड्याची सुरुवात शेअर बाजार कोसळून झाली आहे. सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ३० पैशांनी घसरून ८५.७४ वर पोहोचला. तसेच सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ३,९३९.६८ अंकांनी घसरून ७१,४२५.०१ वर पोहोचला; निफ्टी १,१६०.८ अंकांनी घसरून २१,७४३.६५ वर पोहोचला.

टॅरिफबाबत अमेरिकेने घेतलेल्या निर्णयांनंतर अनेक देशांच्या शेअर बाजारांमध्ये दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रतिक्रिया मागितली असता, टॅम्प यांनी चकीत करणारी प्रतिक्रिया दिली. मला काहीही बिघडू द्यायचे नाही. पण काही वेळा आजारावर उपचार करण्यासाठी दिलेल्या औषधांचा सुरुवातीला प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते; असे ट्रम्प म्हणाले.

जगभर फार्मा, आयटी आणि ऑटो क्षेत्रातील शेअरमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. ऑस्ट्रेलियाच्या शेअर बाजारात ६ टक्क्यांहून अधिक घसरण दिसून येत आहे, तर दक्षिण कोरियाच्या बाजारात ५ टक्क्यांनी आणि जपानच्या बाजारात १० टक्क्यांहून अधिक घसरण दिसून आली आहे. चीनचा बाजार १० टक्क्यांनी घसरला आहे, तर हाँगकाँगचा बाजार १० टक्क्यांहून अधिक घसरला आहे. बाजारात आणखी १५ ते २० टक्क्यांच्या घसरणीची भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

# वक्फ कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात सहा याचिका

नवी दिल्ली : राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने देशात एकीकृत वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास कायदा, १९९५ अर्थात उमीद कायदा लागू झाला आहे. हा कायदा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या सहा याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आल्या आहेत. मुसलमानांचे धार्मिक स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे षडयंत्र म्हणजे हा कायदा आहे, अशी भूमिका मांडत सर्व सहा याचिकांनी उमीद कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे. काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद, एआयएमआयएम अध्यक्ष



असदुद्दीन ओवैसी, आम आदमी पक्षाचे आमदार अमानतुल्ला खान, असोसिएशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स (एपीएसआर), जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी आणि ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका केल्या आहेत.

काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी शुक्रवारी राष्ट्रपतींनी विधेयकावर स्वाक्षरी करुन त्याचे कायद्यात रुपांतर करण्याआधीच सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. मोहम्मद जावेद हे लोकसभेतील काँग्रेसचे व्हीप आहेत. ते बिहारच्या किशनगंजमधून निवडून आले आहेत. विधेयकाचा मसुदा करण्यासाठी सूचना आणि शिफारशी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचे ते सदस्य होते. आपचे आमदार अमानतुल्ला खान आणि एपीएसआर यांनी शनिवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

## जळगावात ४ दिवसांत ४ हरणांचा मृत्यू

जळगाव : प्रचंड उन्हाळा, पाण्याची टंचाई आणि मानवी वस्तीशी वाढलेला संपर्क या साऱ्या कारणांनी अमळनेर परिसरात वन्यजीवांना धोका निर्माण झाला आहे. गेल्या चार दिवसांत चार हरणांचा मृत्यू तर, तीन पिल्लं विहिरीत पडल्याची घटना समोर आली आहे.

अमळनेर-टाकरखेडा-जळगाव मार्गावर शासकीय गोदामाजवळ एका अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन वर्षांच्या हरणाचा जागीच मृत्यू झाला. हृदयद्रावक बाब म्हणजे, अपघातात हरणीचे पोट फाटल्याने तिच्या पोटातील पिल्लू बाहेर आले आणि त्याचाही दुर्दैवी मृत्यू झाला.

# अपात्र शिधापत्रिका रद्द होणार; १ एप्रिलपासून सुरुवात

## अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून ३१ मे पर्यंत शोधमोहीम चालणार

मुंबई (प्रतिनिधी): अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने राज्यभरातील अपात्र शिधापत्रिका (रेशनकार्ड) रद्द करण्यासाठी १ एप्रिलपासून शोधमोहीम हाती घेतली आहे. बांगलादेशी घुसखोरांसह कोणत्याही विदेशी नागरिकाला रेशनकार्ड दिल्याचे आढळल्यास ते रद्द केले जाणार आहे. विभागाने नुकताच याबाबतचा आदेश जारी केला. ही शोधमोहीम दोन महिने म्हणजे ३१ मे २०२५ पर्यंत चालणार आहे. अपात्र रेशनकार्ड शोधण्याची मोहीम २८ जानेवारी २०२१ रोजीच्या आदेशानुसार हाती घेण्यात आली होती. पण त्यानंतर



चारच महिन्यात त्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. आता पुन्हा नव्याने सुधारित मोहीम हाती घेण्यात येणार आहे. तसेच ती दरवर्षी राबवली जाणार आहे.

अंत्योदय, केशरी आणि शुभ्र अशा सर्वच काडांची तपासणी आता केली जाईल. जो कार्ड अपात्र असल्याचे आढळेल ती लगेच रद्द केली जाणार आहेत. सर्व रेशन दुकानदारांना त्यांच्याकडील काडांची तपासणी करण्यासाठी फॉर्म दिले जाणार आहेत. ते फॉर्म भरून घेतल्यानंतर कोण अपात्र आहेत ते स्पष्ट होईल. अर्ज भरताना वास्तव्याचा पुरावा सोबत द्यावा लागेल. हा पुरावा एक वर्षापेक्षा जुना नसावा, ही मुख्य अट आहे. कार्डधारकांकडून आलेल्या माहितीची तपासणी अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून केली जाईल. ज्यांनी वास्तव्याचा पुरावा दिलेला नसेल त्यांना १५ दिवसांची मुदत दिली जाईल. या मुदतीत पुरावा सादर न केल्यास रेशनकार्ड रद्द करण्पात येणार आहे.

एका पत्त्यावर दोन रेशनकार्ड असतील किंवा एका कुटुंबात दोन रेशनकार्ड दिलेली असतील, तर त्यातील एक रद्द केले जाणार आहे. या शोधमोहिमेत शासकीय, निमशासकीय, खासगी कर्मचारी, कामगार ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल आणि अशांकडे पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड असेल तर ती तत्काळ अपात्र ठरविली जातील. त्यांना त्यांच्या उत्पन्नानुसार रेशनकार्ड दिले जाईल. दुबार, अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती आणि मृत व्यक्तींना लाभार्थींच्या मादीतून वगळले जाणार आहे.

# भाविकांनी भरलेली बस भररस्त्यात पेटली, चालकाच्या सतर्कतेमुळे ४० प्रवासी सुखरूप

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ एप्रिल

जिल्ह्यातील औंढा नागनाथ ते वसमत मार्गावरील वगरवाडी शिवारात सोमवार दि ७ एप्रिल रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास भाविकांना घेऊन जाणारी एक प्रवासी बस भररस्त्यात पेटली. या बसमधून तब्बल ४० प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने बस चालकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने सर्व प्रवाशांना सुखरूप बस खाली उतरवले त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. घटनास्थळी अग्नीशमन दलाने आग विझवली मात्र सामानाचे मोठे नुकसान झाले असून पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

याबाबत अधिक माहीती अशी की, कर्नाटक राज्यातून एक खाजगी बस ४० भाविकांना घेऊन औंढा नागनाथच्या दिशेने येत होती. सदर बसमध्ये भाविकांसह त्यांचे सामानही मोठ्या प्रमाणात होते. दुपारी



साडेचारच्या सुमारास ही बस वसमतकडून औंढा नागनाथकडे येत होती. यावेळी वगरवाडी शिवारात बसच्या पाठीमागील भागातून अचानक धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे चालकाने तातडीने बस थांबवून भाविकांना खाली उतरविले. यावेळी परिसरातील नागरिकही त्यांच्या मदतीसाठी धावले. त्यांनी वाहनातील सर्व प्रवाशांना खाली उतरविले व काही सामानही बाहेर काढले. परंतु काही मिनीटातच आगीने रौद्ररूप घेतले. रस्त्याच्या दोन्ही बाजुला मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या तसेच मोठ्या संख्येने नागरिकही जमा झाले होते. या घटनेची माहीती मिळताच औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे पोनि जी एस राहीरे यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. औंढा नागनाथ नगरपंचायतीचे अग्नीशमन दल घटनास्थळी दाखल झाल्यानंतर आग विझवण्यात आली आहे. या घटनेची माहीती मिळताच जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तहसीलदार हरीश गाडे यांना घटनास्थळी रवाना केले असून भाविकांच्या भोजनव निवासाची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## किरीट सोमैयांनी ७२ मशिदीं विरोधात नोंदवला एफआयआर

मुंबई : भारतीय जनता पार्टीच्या अर्थात भाजपाच्या किरीट सोमैया यांनी गोवंडीतील ७२ मशिदींविरोधात



एफआयआर नोंदवला आहे. एफआयआरमध्ये नमूद ७२ मशिदींमध्ये ध्वनीक्षेपकाचा अर्थात लाऊडस्पीकरचा बेकायदा वापर सुरू असल्याची तक्रार किरीट सोमैया यांनी केली आहे. परवानगी न घेताच मशिदींकडून लाऊडस्पीकरचा वापर सुरू आहे, असा किरीट सोमैया यांचा आरोप आहे.

किरीट सोमैया यांनी पाच एप्रिल रोजी गोवंडीती शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गोवंडीतील ७२ मशिदींविरोधात एफआयआर नोंदवला आहे. परवानगी न घेताच गोवंडीतील ७२ मशिदींमध्ये ध्वनीक्षेपकाचा अर्थात लाऊडस्पीकरचा बेकायदा वापर सुरू असल्याची तक्रार किरीट सोमैया यांनी केली आहे. एफआयआर नोंदवल्यानंतर एक्स पोस्ट करुन तक्रार केल्याची माहिती किरीट सोमैया यांनी सार्वजनिक केली आहे.

# पोलीस कॉन्स्टेबलची आत्महत्या

सिंधुदुर्ग : कुडाळ पोलीस ठाण्यात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत असलेल्या सुरज अनंत पवार (३१, रा. मळगाव-कुंभार्लीवाडी, ता. सावंतवाडी, सध्या रा. रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्स, केळबाईवाडी, कुडाळ) याचा मृतदेह ते राहत असलेल्या रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्स मधील फ्लॅट मध्ये सिलिंग फॅनला गळफास घेतलेल्या अस्वस्थेत आढळून आला. तपासाअंती सूरज यांनी आत्महत्या केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आज दुपारी पावणेचार पूर्वीची हि घटना असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, सुरज अनंत पवार हे कुडाळ पोलीस ठाण्यात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत होते. अलीकडेच काही महिन्यांपूर्वी आवळेगाव आऊटपोस्ट येथून ते कुडाळ पोलीस ठाण्यात हजर झाले होते. ते कुडाळमधील रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्समध्ये एकटेच राहत होते. आज दुपारी त्याच्या मित्राच्या मोबाईल वर त्यांनी 'तुला कुडाळला यावेच लागेल, मी जीवन संपवीत आहे' अशा आशयाचा मेसेज टाकला. त्या मित्राने याची कल्पना त्याचा मळगाव येथील भावाला दिली. ते तातडीने कुडाळला आले. तो राहत असलेल्या फ्लॅटवर गेले असता बाहेरून लॅच लावलेले होते. परंतु किल्ली बाहेर ठेवलेली होती. त्यांनी दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता सुरज पवार पंख्याला दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सुरज यांच्या आत्महत्येचे नेमके कारण मात्र समजू शकले नाही. सूरज हे मळगाव-कुम्भार्लीवाडी येथील मूळ रहिवाशी होते. त्यांच्या त्या घरी आई, भाऊ, वहिनी आणि पुतण्या असा परिवार आहे. तर, त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन वर्षांचा मुलगा आहे. सुरज पवार यांच्या या जाण्याने कुडाळ पोलीस ठाण्यातील त्यांच्या सहकाऱ्यानी हळहळ व्यक्त केली. पोलीस उप विभागीय अधिकारी कांबळे यांनी सुद्धा याप्रकरणी कुडाळ पोलीस ठाण्यात तातडीने भेट देऊन माहिती घेतली. अधिक तपास पीएसआय माने करत आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





(छाया-कृष्णा शिंदे,बीड)



## जिल्ह्यात राम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

श्रीराम नवमीचा उत्सव रविवारी जिल्हाभरात विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा झाला. जिल्ह्यातील विविध ठिकाणची श्रीराम मंदिरे सकाळपासूनच भाविकांच्या गर्दीने फुलून गेली होती. दुपारी १२ वाजता मंदिरात राम जन्म सोहळा पार पडला.



गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे रामनवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे कीर्तन करतांना ह.भ.प.महादेव महाराज गिरी

## जुन्या पेंशनसाठी शिक्षक शिष्टमंडळ भेटले
## शिक्षणमंत्री दादा भुसेंचा सकारात्मक प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ एप्रिल**

येथील मंत्री दादा भुसे यांच्या निवासस्थानी जुन्या पेंशनसाठी शिक्षक शिष्टमंडळ जाऊन भेटले असता मंत्री महोदयानी सकारात्मक प्रतिसाद दिला.व लवकरच त्यावर निर्णय घेऊ असे शिष्टमंडळाला सांगितले.



ज्या शिक्षकांची जाहिरात १नोव्हेंबर २००५पूर्वी ची आहे परंतु नियुक्ती नंतरची आहे.अशा सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू झाली आहे. परंतु जे शिक्षक खाजगी आस्थापनेवर आहेत अशा शिक्षकांसाठी अद्याप सरकारने आदेश निर्गमित केलेला नाही. तो आदेश शालेय शिक्षण व क्रीडा मंडळ या विभागानी लवकरात लवकर निर्गमित करावा यासाठी शिक्षकांच्या शिष्टमंडळाने मंत्री दादा भुसे यांना भेटले घेतली असता त्यांनी यावर लवकरच निर्णय घेऊ असे शिष्टमंडळाला आश्वासित केले.

०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी जाहिरात आलेल्या व ०१ नोव्हेंबर ,२००५ रोजी किंवा नंतर नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचारी व प्राथमिक शिक्षकांना जुनी पेन्शन दिली गेली मात्र १००% खाजगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकाना लागू केलेली नाही. असे महाराष्ट्रात फक्त १५० शिक्षक आहे. त्यासंबंधीची फाईल शिक्षण विभागाकडे पाठवून तुमचा प्रश्न मार्गी लावू असे सांगून संबंधित विभागाला तशा प्रकारच्या सूचना दिल्या. या शिष्टमंडळात प्रकाश गायकवाड सानप व राठोड शिवाजी गायकवाड यां सहित अनेक शिक्षक बांधव उपस्थित होते.

# रामजी की निकली सवारी, रामजी की लिला है न्यारी
## श्रीराम जन्मोत्सवा निमित्त मिरवणुक उत्साहात

**हजारो रामभक्त युवकांचा सहभाग श्रीरामाच्या भव्य मुर्तीचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ एप्रिल**

अंबाजोगाई शहरात रामजन्मोत्सव निमित्त्याने भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली मिरवणुकीत हजारो रामभक्त युवकांचा सहभाग होता या निमित्ताने शहरात भगवे ध्वज,पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती

रामभक्तांच्या वतीने शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली पाटील चौक भागातील राममंदीर येथून या मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील विविध महत्वपुर्ण चौक,मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या मिरवणूकीने मार्गक्रमण केले. यावेळी भव्य अशा श्रीरामांच्या भव्य आकर्षक मुर्तीचे भक्तांनी दर्शन घेतले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मिरवणुकीने शहरातील वातावरण भक्तीमय



अंबाजोगाईत राम जन्मोत्सव सोहळयानिमित्त पारंपारीक राम मंदिरात जन्मोत्सव तसेच पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला या निमित्त्याने शहराच्या धार्मिक वैभवात भर पडली तसेच वातावरण भक्तीमय झाले विशेष म्हणजे शहरातून निघालेली भव्य मिरवणूक शहराचे प्रमुख आकर्षण होती, प्रभु रामचंद्रांच्या मुर्तीचे विधिवत पुजन करून या मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला. गेल्या काही वर्षापासुन होत असलेल्या या मिरवणूकीने अंबाजोगाईच्या धार्मिक तसेच सांस्कृतिक वैभवात भर घातली शहराला धार्मिक वारसा असून मिरवणूकीच्या निमित्ताने यात अधिक भर घातली गेली आहे.

भगवे ध्वज ठरले आकर्षण

कोरोना संकटामुळे युवकांना सर्व सण, उत्सव साजरे करता आले नाहीत संकट नाहिसे झाल्यानंतर श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असता यात हजारो युवक भगवे ध्वज घेवून मिरवणूकीत समुहाने सामील झाले होते.हे युवक अधिक आकर्षण ठरले. विविध रामगीतांच्या गाण्यावर अभिनय आणि नृत्य करून आपल्या हातातील ध्वज हवेत उंचवून नागरिकांचे लक्ष वेधत होते. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणच्या रस्त्यावर रांगोळ्या काढून भगव्या पताका, ध्वज, फलक, लावुन मिरवणुकीचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

## लोकनेत्या पंकजाताईंचे नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात भाजप स्थापना दिन उत्साहात साजरा-शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ एप्रिल**

लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील १३ मंडळात भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला असल्याची माहीती भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे

दि ६ एप्रिल हा भाजपचा स्थापना दिन असुन या वर्षी हा स्थापना दिन देशभरात भाजपने मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे ठरविले होते कारण हा स्थापना दिन व प्रभू श्रीराम नवमी एकाच दिवशी आली आहे अयोध्येत प्रभू श्रीरामाचे मंदिर भव्य झाले आहे त्याच प्रमाणे महाराष्ट्रात भाजपचे देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले आहे त्याप्रमाणे भाजपचे संघटन पर्व सुरु असल्याने आणि भाजपने महाराष्ट्रात १.५० कोटी भाजप सदस्य संख्येचे उद्दीष्ठ पूर्ण केले असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेजी कार्याध्यक्ष श्री रविंद्र चव्हाणजी यांनी महाराष्ट्रात हा स्थापनादिन महाराष्ट्रातील प्रत्येक बुथ स्तरावर हा साजरा करण्याचे आवाहन केले होते बीड जिल्ह्यात लोकनेत्या ना.पंकजाताई यांच्या नेतृत्वाखाली ११ तालुक्यातील १३ मंडळात हा स्थापना दिन करण्यात आला प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या घरावर पक्षाचा झेंडा लावून सेल्फी घेतला तसेच मंडळात सकाळी ९ वा कार्यालयावर पक्षाचा झेडा फडकवून भारतमाता,पंडीत दीनदयालजी,डॉ शामा प्रसादजी,प्रमोद महाजन गोपीनाथजी मुंडे यांचे प्रतिमापूजन केले व दुपारी १.३० वा स्क्रिन लाऊन ऑनलाईन स्थापना दिना निमित्ताने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांचे मार्गदर्शन कार्यालयात संपन्न केले परळी अंबाजोगाई माजलगाव कडा आष्टी गेवराई बीड वडवणी धारुर केज आदी ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाले व विविध नेत्यांनी मार्गदर्शन ही केले बीड जिल्ह्यात दोन लाख भाजप सदस्य झाले असल्याचे ही श्री शंकर देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.



## रामनवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत न्यु इरा पब्लिक स्कूल शाळेचा प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ एप्रिल**

रामनवमी निमित्त गेवराई शहरातील राममंदिर या ठिकाणी शनिवार दि. ५ रोजी सायंकाळी ७ वाजता वैयक्तिक तथा समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत न्यु इरा पब्लिक स्कूल या शाळेने प्रथम क्रमांक मिळवला असून शाळेचे व सहभागी विद्यार्थी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

रविवार दि. ६ रोजी राम जन्मदिनाचे औचित्य साधून शनिवार दि. ५ रोजी राम जन्म उत्सव समितीच्या मार्फत वैयक्तिक तथा समुह नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये शहरातील विविध छोट्या व मोठ्या कलावंतांने यांत सहभाग नोंदवून प्रभू श्रीराम यांच्या गाण्यावर नृत्य सादर करुन आपले कलागुण सादर केले. यामध्ये न्यु इरा पब्लिक स्कूल गेवराई या शाळेतील शौर्यन घोरपडे याने श्रीराम यांची भुमिका, वेदांग कुलकर्णी याने लक्ष्मण यांची भुमिका तर तन्मयी घाडगे हीने सीतामाता यांची भुमिका निभावली. तसेच रुद्र येवलेकर याने रावण यांची भुमिका बजावली, अभिषेक कोकाट याने हनुमान यांची तर वैष्णवी नाईक, ओमकार भुते, भावेश दावणगिरे, श्रेयस सोनार, सर्वेश म्हेत्रे, समर्थ जोशी, आर्या कोरडे, श्रृती खेत्रे, स्वरदा सराफ, स्वरा पंडित, आर्वी सुरवसे, सोनाक्षी पवार, आराध्या हुलजुते यांनी वानर,कौशल्या ,शृपनखा व ऋषी यांची भुमिका निभावली व प्रभू श्रीराम यांची कथा नाट्य रूपी सादर केली. उपस्थित मान्यवर व प्रेक्षकांची मने जिंकली. या बहारदार नाटक रूपी नृत्यास शाळेने प्रथम क्रमांक मिळवला असून सहभागी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष गणेश क्षीरसागर, मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा क्षीरसागर यांनी अभिनंदन केले असून या नाटीकेची तयारी रूक्मिणी मानसुरे, श्रावणी क्षीरसागर यांनी केली. या यशाबद्दल सहभागी विद्यार्थी व शाळेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आ.सौ.नमिता मुंदडाच्या बंगल्यावर भाजपा स्थापना उत्सव साजरा
### जनतेला दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी-डॉ.शरदराव हेबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ एप्रिल**

भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या आई निवासस्थानी विविध कार्यक्रम संपन्न झाले. ध्वजारोहण, कारसेवकांचा सत्कार, जेष्ठांचा सन्मान, मोटार सायकल रॅली आदी उपक्रम जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. दरम्यान स्थापना दिना निमित्त बोलताना डॉ.शरदराव हेबाळकर यांनी भारतीय जनता पार्टी म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष, ज्यांनी राष्ट्र मंदिर बांधण्याचा केलेला संकल्प राम मंदिर उभा करूनच दाखवला. ३७० कलम बाजुला करून राष्ट्रभक्तीची ज्योत याच पक्षाने पेटवली. महापूरूषांच्या बलिदानापासुन स्थापन झालेला पक्ष म्हणजे भाजपा हे त्यांनी सांगितले. प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनीही भाजपाच्या ऐतिहासिक वाटचालीची आणि सद्यस्थितीतल्या सुवर्णकाळाची ओळख कार्यकर्त्यांना करून दिली.



महापुरूषांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर शहरतल्या ज्यांनी १९९२ ला कारसेवा केली, त्यांचा सत्कार आमदाराच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देवुन केला. सौ.शरयुताई हेबाळकर, प्रकाशराव जोशी, कल्याणी जोशी, उन्मेष मातेकर, दामोदर राऊत, रमाकांत सेलमोहकर, विनय जहागिरदार, आप्पाराव यादव, जेष्ठ पत्रकार हणुमंत पोखरकर, मुळे मॅडम, जयंत हमिने आदींचा समावेश होता तर पक्षाचे जेष्ठ नेते कांतीलाल केंद्रे, मामा रेणापुरे, नारायणरावजी केंद्रे, भास्करराव धर्मपात्रे, मोहनराव कराड, शामराव औसेकर, शशीकांत गायकवाड, डॉ.सुधीर धर्मपात्रे,माजी नगराध्यक्ष महादेव मस्के, सभापती काजगुंडे, ॲड.शरदराव इंगळे, अनंतराव आडसुळ आदीसह इतरांचाही सन्मान बैठकीत करण्यात आला. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी कारसेवा करताना १९९२ साली झाशी येथे तब्बल तेरा दिवस या सर्व सहकार्यांना सोबत घेवुन जेलची सजा भोगली. त्याचे अनुभव कथन त्यांनी केले. अगदीच म्हटलं तर जेलमध्ये आम्ही सारे पेपर टाकुन झोपायचो. अन्नपाणीही पोलीसांनी खावु दिलं नव्हतं. स्व.प्रमोद महाजन, गोपीनाथराव मुंडे, विमलताई मुंदडा आदींच्या आठवणी त्यांनी यावेळी सांगितल्या. या मतदारसंघात पक्षाच्या माध्यमातुन काम करताना मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रितमताई यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वांना सोबत घेवुन काम करतो. माणसं जोडणं आणि एकत्रित रहाणं ही खर्या अर्थाने आता काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कांतीलाल दादा केंद्रे यांनी जुन्या काळातील अनुभव सांगताना वर्तमान भाजप पक्षाला आलेले चांगले दिवस आणि या काळात असलेले कार्यकर्ते खरे भाग्यवान असल्याचे सांगितले. प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी भाजपा हा संस्कार आणि व्यक्तिमत्व घडवणारा पक्ष असुन जबाबदारी आणि कर्तव्य जाण ओळखुन कार्यकर्ता काम करतो. पक्षात काम करताना निष्ठा अत्यंत महत्वाची असुन जनसंघाच्या स्थापनेपासुन पक्षाची झालेली वाटचाल आणि राज्यात पक्ष वाढीसाठी स्व.गोपीनाथराव मुंडेंचे असलेले योगदान याची ओळख त्यांनी करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना शरदराव हेबाळकर म्हणाले की, राजकिय व्यवस्थेत भाजपा म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष अशी त्याची ओळख. ज्या पक्षाने स्थापन होताना ३७० कलम बाजुला करू, प्रभु रामचंद्रांचं मंदिर बांधु हे सांगितलं ते पुर्ण करायला आजचा दिवस उजाडला. प्रकाश बोरगावकरांनी सुत्रसंचालन केले. अनंतराव आडसुळ त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी उत्सव घडवुन आणल्याचं कौतुक मुंदडांनी केले.

## शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यासाठी निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी
### उल्हास गिराम यांची जिल्हाधिकारी यांना मागणी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ एप्रिल**


वाढत्या तापमाणामुळे बीड जिल्यात उष्णतेच्या झलाया वाढत आहेत. उषाघात, मळमळ, चक्कर येणे असे प्रकार वाढत आहेत. शासकीय कामानिमित्त शहरी व ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणावर युवक, महिला, वयोवृद्ध येतात. काहींना दिवसभर ताटकळत बसावे लागते. अशा नागरिकांना प्रखरउन्हाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्यातील प्रत्येक कचेरी कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याचा पाण्याची सोय करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

येणारे तीन महिने प्रखर उष्णतेचे असतील. उष्माघाताच्या घटना वाढण्या आगोदर प्रशासनाने खबरदारी घ्यावी. वेळीच उपाययोजना कराव्यात. विविध शहरात बसस्थानाकाची कामे सुरु आहेत, त्याठिकाणी ही निवारा असावा. जिल्ह्यातील सर्वच प्रत्येकी तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, सत्र न्यायालय, निबंधक कार्यालय या सह श्यक्य होईल त्या प्रशासकीय कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक साहेब यांची भेट घेऊन सदरील मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

या वेळी त्यांच्या समवेत उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडेकर, राजु भाऊ मुहावले, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, शिरूर तालुका सोपान मोरे, कामगार सेनेचे रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, गणेश घुबर्डे, प्रदीप कोटुळे, सतीशसिह परदेशीं, साईनाथ ढाकणे, दिलीप नाना पवार यांच्या सह आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (८३) जीवित कर्तव्य

श्री गुरुजी प्रवासात एका शिक्षणाधिकाऱ्याकडे गेले होते. तिथे त्यांचा मुलगा गुरुजींना म्हणाला जन्माष्टमी का साजरी करतात. आम्हाला शाळेत शिकवतात, हा कृष्ण व्याभिचारी होता. त्यापेक्षा येशू ख्रिस्ताचा जन्मदिन पाळा. गुरुजी म्हणतात असा प्रश्न एक आठ नऊ वर्षाचा मुलगा विचारेल अशी आपण कल्पना तरी करू शकतो का ?

जीवन हे वासना आणि विकार यांचे केवळ गाठोडे नाही तर आपल्यात जे एक शिवतत्व आहे, त्या तत्त्वाचे ज्ञान व त्याचे प्रकटीकरण हे हिंदू शिक्षण पद्धतीचे मूलभूत उद्दिष्ट असले पाहिजे. हे ध्यानी धरूनच संघ स्वयंसेवकांनी रामायण, महाभारत किंवा आपल्या इतिहासातील राष्ट्रीय महापुरुषांचे स्मरण करून देणारे प्रसंग शाखेत किंवा विविध शाळेत, महाविद्यालयात सांगणे - शिकवणे आवश्यक आहेत. भारताची ओळख ही तिची सांस्कृतिक विरासत आहे. याचा अर्थ भारत निर्माणात ऋषी-मुनी, संत- महंत, आचार्य धर्माचार्य, दर्शनीक, ज्ञानी- विज्ञानी, शिक्षक, सेवा देणारे, ध्येयप्राप्तीसाठी झटणारे या सर्वांचा हात आहे. त्यांचे स्मरण करून त्यांचे दर्शन घडवणे हे आपले जीवित कर्तव्य समजावे.

आपल्या पंतप्रधान मोदींनी २०२२च्या स्वातंत्र्यदिनी जे पाच प्रण सांगितले त्यातील दोन इतिहास विषयकच आहेत. (१) गुलामी के एहसास का कोई अंश ना रहे (२) हमे अपनी विरासत पर गर्व हो आणि हे दोन्हीही प्रण गुरुजी नेहमीच सांगत असत. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी सचिन घायाळ गटाचे गणेशराव घायाळ विजयी

## सी.ए. सचिन घायाळ यांचे कारखान्यावर वर्चस्व कायम

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ : पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या येथील श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी सी.ए. सचिन घायाळ गटाचे गणेश प्रल्हादराव घायाळ यांची निवड करण्यात आली. चेअरमन पदासाठी झालेल्या निवडणुकीत घायाळ यांनी तुषार शिसोदे यांचा पराभव केला. कारखान्याचे चेअरमन सी.ए. सचिन घायाळ यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या चेअरमन पदासाठी सोमवारी (दि. ७) रोजी निवडणुक पार पडली. निवडणूक अधिकारी म्हणून विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई व विष्णु रोडगे यांनी काम पाहिले.



चेअरमन पदाच्या निवडणुकीत सी.ए. सचिन घायाळ यांच्या गटाचे गणेशराव घायाळ यांनी माजी चेअरमन तुषार शिसोदे यांचा दणदणीत पराभव केला. गणेशराव घायाळ यांना ११ तर तुषार शिसोदे यांना ८ मते मिळाली. सचिन घायाळ यांच्या नियोजनामुळे व एकनिष्ठ संचालकामुळे विजयश्री खेचुन आणता आली अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचीत चेअरमन गणेशराव घायाळ यांनी दिली.

यावेळी बोलतांना सी.ए. सचिन घायाळ यांनी तुषार शिसोदे यांनी चेअरमन असतांना १२ हजार सभासदांची नावे मतदार यादीतुन कमी केल्याचा आरोप केला. आगामी काळात कारखाना प्रगती पथावर नेण्यासाठी नवनिर्वाचीत चेअरमन व संचालक मंडळास सोबत घेऊन काम करण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याचे सांगितले. याप्रसंगी विक्रमराव घायाळ, संचालक आबासाहेब मोरे, एकनाथ नवले, भाऊसाहेब पिसे, भरत अप्पा घायाळ, दिपक फांदाडे, रमेश कचरु झिणे, शिवाजी जाधव, बाबासाहेब खरात, सौ. ताराबाई रामेश्वर घायाळ, सौ. ऊषाबाई सुखदेव थोरात, सौ. अनुराधा कैलास तुपकरी, दिगंबर गोर्डे, दत्तात्रय वाकडे, ड. घायाळ, सुनिल घायाळ, गणेश पवार, अमोल घायाळ यांच्यासह शेतकरी व नागरिक उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून, गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.




## आत्रेय कोर्स सुरू केला

नांदेड-मोठ्या प्रमाणात परिणाम आधारित शिक्षण पुरविणारे भारतातील एकमेव हायब्रिड लर्निंग प्लॅटफॉर्म- इन्फिनिटी लर्नचा उपक्रम असलेली श्री चैतन्या अकॅडमी यांनी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा अर्थात नीट(एनईईटी) परीक्षेच्या तयारीसाठी आत्रेय हा एक अद्वितीय कोर्स लाँच केला आहे. डिजिटल साधनांनी परिपूर्ण हा कोर्स रिअल-टाइम परफॉर्मन्स ट्रॅकिंग करतो. हा कोर्स विशेषतः फिजिक्स शिकवणीवर अधिक भर देतो,जी नीट(एनईईटी) परीक्षेत यश मिळविण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी एक आव्हानात्मक विषय मानला जातो.आत्रेय हा कोर्स तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या परफॉर्मन्सचे रिअल-टाइम विश्लेषण करतो, ज्ञानाची कमतरता ओळखतो आणि वैयक्तिकृत शिक्षण धोरणे सुचवतो.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्ट्रेस-रिलीफ वर्कशॉप आणि समुपदेशन सत्रांचा समावेश करण्यात आला आहे

## पॉलीकॅब इंडियाने फॅन श्रेणीमध्ये सुपर आरओआय फॅन्स

जळगाव - इलेक्ट्रिकल सोल्यूशन्समधील आघाडीची कंपनी पॉलीकॅब इंडिया पंख्याच्या श्रेणीत आपली उपस्थिती आणखी मजबूत करत आहे. कंपनीने सुपर आरओआय फॅन्सची एक नवीन श्रेणी लाँच केली आहे, जी या श्रेणीमध्ये गुंतवणुकीवर परतावा (आरओआय) चे नवीन मानके स्थापित करेल. ही श्रेणी उत्तम कामगिरी, ऊर्जा कार्यक्षमता आणि आधुनिक डिझाइनचा परिपूर्ण संयोजन देते. वाढत्या ऊर्जेच्या किमती आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंतींमुळे, पॉलीकॅब ग्राहकांना त्यांच्या पैशाचे चांगले मूल्य मिळावे यासाठी नाविन्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करण्यासाठी समर्पित आहे.

## नोईजने भारतात लाँच केले मास्टर बड्स - प्रीमियम

पुणे, ६ मार्च २०२५ - भारतातील अग्रगण्य कनेक्टेड लाइफस्टाइल ब्रँड नोईजने आपल्या नवीनतम ऑडिओ इनोव्हेशनची घोषणा केली आहे. नोईज मास्टर बड्स, हे ब्रँडच्या नव्याने सादर केलेल्या मास्टर सिरीजअंतर्गत लाँच झालेले पहिले उत्पादन आहे. या टीडब्ल्यूएस इयरबड्समध्ये साउंड बाय बोस तंत्रज्ञानाचा समावेश असून, प्रीमियम दर्जाचा ऑडिओ अनुभव प्रदान करण्यासाठी ते तयार करण्यात आले आहेत. नोईज मास्टर बड्स ४९डीबी ॲक्टिव्ह नॉईज कॅन्सलेशनसह येतात, जे वापरकर्त्यांना अधिक शांत आणि खिळवून ठेवणारा संगीत अनुभव देतात. ड्युअल डिव्हाईस कनेक्टिव्हिटी आणि गुगल फास्ट पेअरिंगसारखी प्रगत वैशिष्ट्ये हे इयरबड्स सहजतेने वापरण्यास सोपे बनवतात. यामध्ये स्पॅटिअल ऑडिओ सपोर्ट आणि १२.४मिमी ड्रायव्हर्स आहेत, आणि टायटॅनियमसारख्या उच्च दर्जाच्या साहित्याने तयार केले आहेत. याशिवायएलएचडीसी (लो लेटन्सी हाय डिफिनिशन ऑडिओ कोडेक) सपोर्ट असल्याने उच्च-गुणवत्तेचा ऑडिओ अनुभव मिळतो.

## यात्री आता ओएनडीसी सोबत

मुंबई - मुंबई लोकलसाठी अधिकृत यात्री ॲप, भारतीय रेल्वेशी भागीदारीत विकसित झाले असून, मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील प्रवाशांसाठी हे अत्यंत उपयुक्त ठरत आहे. अवघ्या तीन वर्षांत २५ लाखांहून अधिक वापरकर्ते मिळवत, यात्री ॲपने शहरी प्रवास अधिक सुलभ करण्याचा वसा घेतला आहे. रिअल-टाइम अपडेट्स, प्रवाशांसाठी उपयुक्त सुविधा आणि डिजिटल मेट्रो तिकिटिंग यामुळे हे ॲप प्रवाशांचे आवडते माध्यम बनले आहे. आता यात्री ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ओएनडीसी) या सरकारी उपक्रमाचा भाग बनले आहे, जो भारतभरातील डिजिटल तिकिटिंग प्रणालीत क्रांती घडवत आहे.

## सोयगाव येथे महिको कंपनीचे दमदार मक्का वाण एम.आर.एम.४०६५ पिक पाहणी संपन्न



सोयगाव,दि.७ एप्रिल - सोयगाव येथील प्रगतशील शेतकरी श्याम विठ्ठल पाटील यांच्या शेतात दि.४ शुक्रवार रोजी हा कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमांमध्ये महिको कंपनीच्या मक्का एम.आर.एम.-४०६५,एम.आर.एम.-४०६४,एम.आर.एम.-३८४५,तसेच धनदेव प्लस, बाहुबली प्लस,आणि ७३५१ गोल्ड या वाणाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.या कार्यक्रमासाठी महिको कंपनीचे रिजनल मॅनेजर हर्षद बोंडाळे व टेरिटरी मॅनेजर सुनील वाघ हे उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्ये श्याम पाटील शेतकरी व कृषी भूषण पुरस्कार प्राप्त अरुण सोहनी समाधान आगे व प्रवीण पाटील यांनी चांगले उत्पन्न घेतल्यामुळे त्यांना सन्मानित करण्यात आले तसेच जमिनीतील जलसाठा वाढवण्यासाठी जलतारा प्रोजेक्ट ची माहिती भास्कर चौधरी यांनी दिली व अतिघन लागवडीसाठी महिकोच्या- ७३९९ या वाणाविषयी माहिती सोयगाव शहरातील प्रगतशील शेतकरी व कृषी भूषण अरुण सोहनी यांनी दिली आणि हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिकोचे तालुका प्रतिनिधी सतीश बोडखे यांनी मेहनत घेतली तसेच या कार्यक्रमासाठी सोयगाव तालुक्यातील विविध भागातून अनेक शेतकरी बांधव आणि विक्रेते उपस्थित होते.

# कन्नड न्यायालयात आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०७ एप्रिल - कन्नड दिवाणी व फौजदारी न्यायालयात जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर दि.०७ रोजी संपन्न झाले

दिवाणी व फौजदारी न्यायालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,व कन्नड ग्रामिण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने कन्नड न्यायालय परिसरात सकाळी रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले आरोग्य तपासणी शिबिरात



७७ वकिलांसह ३१ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली तर रक्तदात्यांनी रक्तदान केले

न्यायाधिश व्ही.डी. पाटील,न्यायाधिश व्ही. एन.काटकर,यांनी उपस्थित वकिल व नागरिकांना मार्गदर्शन केले,यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ.अनिरुद्ध गायकवाड,तालुका वकिल संघाचे अध्यक्ष उमेश वारे,वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपेश माटे,डॉ.सिकंदर कुरेशी, डॉ.नितीन सरवदे,उपाध्यक्ष एम.एच.सय्यद,सचिव एस.आर.राऊत,वकिल एस.ई. धनेधर,वकिल पी.एस. जाधव,वकिल स्वप्निल उपासनी, वकिल निसार शेख,वकिल निलेश थोरात, वकिल सचिन बोरसे,वकिल डी. एन.चव्हाण,वकिल एम.जी.देशमुख, वकिल डी. डी. हराळ, वकिल एस.आर. शिंदे,कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे रोहितराज क्षीरसागर, शशीकांत गांगुर्डे, नसरीन सय्यद, मयूर मोतीवाले,विशाल उंडे, अमोल घुगरे,शुभम आहेर,प्रमिला राठोड, अकिला शेख,कविता पावरा सह वकिल नागरिक उपस्थित होते.

# नागद येथील शेतकऱ्यांनी दिले निवेदन विविध योजनाचा लाभ देण्याची केली मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०७ एप्रिल - तालुक्यातील नागद, नागद तांडा, भोपेवाडी, सोनवाडी येथील शेतकऱ्यांना किसान सन्मान योजना, नमो शेतकरी, पीक विमा अतिवृष्टी तसेच इतर शासकीय योजनेचा लाभ तातडीने देण्यात यावा या मागणीचे निवेदन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्याकडे करण्यात आली आहे.



नागद येथील शेतकरी भाऊसाहेब अहिरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नागद, नागद तांडा, भोपेवाडी, सोनवाडी येथील अनेक शेतकऱ्यांना शेतकरी सन्मान योजना, नमो शेतकरी योजना या योजनाचा लाभ मिळत नाही त्यामुळे सदरील शेतकरी वारंवार तहसील कार्यालयात चकरा मारतात, यातील बरेच जण अशिक्षित असल्याने त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. यातील बऱ्याच शेतकऱ्यांना पिक विमा, अतिवृष्टी याचाही लाभ अद्याप झाला नाही त्यामुळे त्यांच्यावर मोठा अन्याय होत असल्याची भावना आहे त्यामुळे तात्काळ हा प्रश्न मार्गी लावून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे, निवेदनावर सीताराम अहिरे, जवरीलाल राठोड, सरलाबाई राठोड, एकनाथ चौगुले, कौतिक चौगुटे, देवीदास जाधव, तुळशीराम राठोड आदिसह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षरा आहेत.

## क्रेडाई अहिल्यानगरच्या अध्यक्ष पदी गिरीश अग्रवाल तर सचिवपदी दीपक बांगर यांची निवड



नगर: देशभरातील बांधकाम व्यावसायिकांच्या प्रतिष्ठित अशा क्रेडाई संघटनेच्या अहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षपदी गिरीश अग्रवाल यांची तर सचिवपदी दीपक बांगर यांची निवड झाली आहे. सन२०२५-२०२७ या वर्षासाठी नूतन कार्यकारिणी नुकतीच निवडण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी अमित वाघमारे, प्रसाद आंधळे , सागर गांधी, खजिनदारपदी विक्रम जोशी , , सहसचिव पदी कमलेश झंवर भिंगारवाला , सहखजिनदार पदी अमित फिरोदिया , संचालक म्हणून मयुर कोठारी , राजेंद्र पाचे , संदीप भापकर , अनिल गांधी यांची निवड झाली आहे.

नवीन अध्यक्ष गिरीश अग्रवाल म्हणाले की, बांधकाम क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल होत आहेत. शासनाने रेरा सारखा कायदा आणून ग्राहकांना विश्वसनीयतेची हमी देण्याचा प्रयत्न केला आहे. क्रेडाईचे सर्व सभासद शासकीय नियमानुसार ग्राहकांना सेवा देण्याचा प्रयत्न करतात. तसेच देशपातळीवर बांधकाम व्यावसायिकांचा आवाज सरकार दरबारी पोहोचवण्यासाठी संघटना प्रयत्न करते.

मावळते अध्यक्ष अमितजी मुथा यांनी दोन वर्षामध्ये त्यांचे टीम ने अहिल्यानगर शाखेने शहरात प्रॉपर्टी एक्स्पो भरवून शहरातील गृहप्रकल्प, कमर्शियल प्रोजेक्ट, फायनान्स योजना एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला असे सांगितले , त्यामुळे बांधकाम क्षेत्राला चालना मिळाली. शासनाने ई नोंदणी ही नवीन प्रणाली विकसित केली आहे. त्याचाही लाभ ग्राहकांना करून देण्याचे काम माझ्या टीम ने केले हे सांगितले . तसेच पुढील क्रेडाई अहिल्यानगर च्या नूतन संचालक मंडळास त्यांनी शुभेच्छा दिल्या.सचिव दीपक बांगर म्हणाले की, क्रेडाई अहिल्यानगर संघटनेने विविध उपक्रम राबवून विश्वासाहर्ता जपली आहे. नगर शहराचा नियोजनबद्ध विकास करण्याच्या दृष्टीने क्रेडाई प्रशासनाशी संवाद साधून असते. पर्यावरण संवर्धन, सुशोभीकरणासाठीही पुढील कार्यकाळात आम्ही क्रेडाई च्या वतीने प्रयत्न करू असे आश्वासन व्यक्त केले.

क्रेडाई अहिल्यानगर शाखेच्या सल्लागार समिती सदस्य पदी आशिष पोखर्णा, संजय गुगळे, ड. जयवंत भापकर यांची निवड झाली आहे. क्रेडाई अहमदनगरच्या विविध कमिटी व पदाधिकारी पुढीलप्रमाणे - क्रेडाई युथ विंग- कन्व्हेनर- धवल इंगळे, को कन्व्हेनर- तुषार लोढा आणि नितेश गुगळे. क्रेडाई वुमेन्स विंग- कन्व्हेनर- आर्की. साक्षी अमित मुथा.

## 'हलगट' - बिबट्या, बाब्या आणि जिलेबीच्या संघर्षाची धक्कादायक कथा १८ एप्रिल उलगडणार!

छत्रपती संभाजीनगर : मराठी चित्रपटसृष्टीत वेगळ्या धाटणीच्या कथांची उणीव असताना एक वेगळी, थरारक आणि हटके कथा घेऊन 'कर्नन फिल्म्स प्रोडक्शन'चा नवा चित्रपट 'हलगट' १८ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा चित्रपट गावाबाहेरच्या एका धोकादायक समुदायाची कथा उलगडतो. या टोळीचा क्रूर प्रमुख आणि त्याच्या विरोधात उभा राहणारा बंडखोर - या संघर्षाच्या छायेत एक नाजूक प्रेमकथा फुलते. लुटीचा खेळ, विश्वासघात, आणि सुटकेच्या प्रयत्नात सगळं काही बदलत जातं. शेवटी जे घडतं ते धक्का देणारं असतं, पण ते खरंच शेवट असतो का, की फक्त एका नव्या प्रवासाची सुरुवात? उत्तर अनुत्तरित राहतं. 'हलगट'ची कथा जितकी जोरदार आहे, तितकंच त्याचं संगीतही प्रेक्षकांच्या मनाला भिडणारं आहे. चित्रपटात वेगवेगळ्या भावनांना उजाळा देणाऱ्या गाण्यांची मालिका आहे. चित्रपटाच्या पार्श्वसंगीतात प्रत्येक दृश्याला अधिक प्रभावी करण्याची ताकद आहे. विशेषतः शेवटच्या दृश्यात पार्श्वसंगीत, अभिनय आणि जिलबीचा धक्कादायक निर्णय या सगळ्याची सांगड प्रेक्षकांच्या मनात खोलवर ठसणार आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे ८ ते १४ एप्रिल कालावधीत आयोजन

अहिल्यानगर, दि. ७ - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ८ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सप्ताहाचे ८ एप्रिल रोजी उद्घाटन करण्यात येणार असून १४ एप्रिलपर्यंत भारतीय संविधानाची उद्देशिका, प्रस्ताविका यांचे नियमित वाचन करणे व जनजागृती करणे आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या सप्ताहात ९ एप्रिल रोजी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालय, शासकीय वसतिगृहे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारांवर आधारीत वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा इत्यादीचे आयोजन तसेच योजनाच्या लाभाचे प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वाटप करणे आदी उपक्रम राबविण्यात येतील.

समतादूतामार्फत ग्रामीण व शहरी भागात १० एप्रिल रोजी पथनाट्य व लघुनाटिका याद्वारे विविध योजनाबाबत जनतेचे प्रबोधन करण्यासोबतच मार्जिन मनी योजनेतंर्गत कार्यशाळा राबविण्यात येणार आहे. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात येईल आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात येईल. १२ एप्रिल रोजी भारतीय संविधानाविषयी माहिती देणारा संविधान जागर कार्यक्रम व महिला मेळाव्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती देणारे व्याख्यान आयोजित केले जाणार आहे.

# अन्नदान, महारक्तदान, रथयात्रा, ध्वजारोहनाने महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा होणार

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - सकल जैन समाज अंतर्गत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती २०२५ च्या तत्वधानामध्ये १० एप्रिल रोजी भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त विविध धार्मिक,सामाजिक व सांस्कुतिक कार्यकम तसेच अन्नदार, महारक्तदान, रथयात्रा, ध्वजारोहनाने महावीर जन्मकल्याणक महोत्सव प्रारंभ होणार असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.



भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवासाठी सकल जैन समाजाचे साधु संत मोठया संख्येने उपस्थित राहणार असुन त्यामध्ये प.पु.प्रेममुनिजी मसा ठाणा-२, अर्केन्दुजीश्रीजी मसा, कल्पज्योतीश्रीजी मसा, शासनज्योतीश्रीजी मसा ठाणा-५, सिध्दीसुधाजी मसा आदीठाणा-३, हिमानीजी मसा आदीठाणा - ७, अमितसुधाजी मसा, नमीताजी मसा ठाणा - २, प्रभाजी मसा ठाणा ७, आदी साधुसंताच्या उपस्थितीत महावीर जन्मकल्याणक साजरा होणार आहे. सकल जैन समाजाचे सन्माननीय अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व ६ पंथ मिळुन महावीर जन्मकल्याणक एकत्र साजरी २००० पासुन एकत्रित साजरी करीत आहोत हे वर्ष रौप्य महोत्सव वर्ष म्हणुन साजरे करत आहे. या वर्षीची टॅग लाईन जी ठेवण्यात आली आहे ती २५ साल बेमिसाल अशी ठेवण्यात आली आहे. शोभायात्रेत पुरैषांनी पांढरे वस्त्र तर महिलांनी केशरी व पिवळया रंगाच्या साडया परिधाना करावयात तसेच दिनांक ०६ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता नमो परिवाराच्या वतीने शासनस्पर्श संगीतभक्तीसंध्या कार्यकम आयोजीत करण्यात आला आहे. दिनांक ७ रोजी महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटी तर्फे ग्रिन मॅटचे वितरण होणार आहे. तसेच ८ एप्रिल रोजी बेबी किटचे वितरण छोटी घाटी येथे होणार आहे. तसेच चंद्रसागर धर्मशाळा शहागंज येथे भगवान महावीर व्याख्यान माला आयोजीत करण्यात आली आहे. यासाठी सतिशजी शर्मा हे व्याख्यानमालेत उदबोधन करणार आहेत. तसेच ९ एप्रिल रोजी विश्वनवकार महामंत्र दिवस निमीत्त सामुहिक जापचे आयोजन करण्यात आले आहे. सकल जैन समाज व भगवान महावीर रसोई घर जैन अलर्ट ग्रुप अंतर्गत १ एप्रिल ते १० एप्रिल पर्यत घाटी येथे गर्जुना अन्नदान सुरै आहे.

सर्व प्रथम सकाळी ६ वाजता मुख्य वाहन रॅली राजाबजार जैन मंदिर,महावीर भवन,विमलनाथ जैन मंदिर, सराफा, टि.व्ही. सेंटर, चिकलठाणा, शिवाजीनगर, दशमेशनगर, रेल्वेस्टेशन, पंढरपुर, वाळुज, पुंडलिकनगर, सिडको एन ९,एम.जी.एम.जैन विद्यार्थी ,गारखेडा,छावणी,चित्तेगांव, जैन रायडर्स आदी शहरातुन युवक युवती व संस्थाव्दारा भगवान महावीर स्तंभावर ध्वजरोहन हेतु महावीर उडडाणपुल येथे उपस्थित राहणार आहे.

तदनंतर सकाळी ७ वाजता सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा व महासचिव महावीर पाटणी यांच्या मार्गदर्शनाखाली व जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख,कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस,मिठालाल कांकरीया, ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला,डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, मिनाश्री उदगीरकर, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, सकल जैन समाजाच्या मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीर चौक येथे धर्मध्वजारोहन होईल तदनंतर ७.१५ वाजता उत्तमचंद जैन छात्रालय येथे ध्वजारोहन होईल तदनंतर गुरैगणेशनगर येथे ध्वजारोहन होईल तसेच सकाळी ८ वाजता पैठणगेट येथुन भव्य रथयात्रा प्रारंभ होईल.

## 'वीर मुरारबाजी' चित्रपटाच्या निमित्ताने अरुण गोविल, दीपिका चिखलिया एकत्र

छत्रपती संभाजीनगर : प्रसिद्ध अभिनेते अरुण गोविल आणि अभिनेत्री दीपिका चिखलिया यांनी प्रत्येक घराघरांत-मनामनांत 'राम-सीता' म्हणूनच विशेष जागा मिळवली आहे. या जोडीची अफाट लोकप्रियता आजतागायत कायम असून त्यांच्या अभिनयाची जादू पुन्हा एकदा आपल्याला अनुभवता येणार आहे. श्रीरामनवमीच्या निमित्ताने या दोघांचे एक आकर्षक पोस्टर प्रदर्शित झाले आहे. 'वीर मुरारबाजी.. पुरंदरकी युद्धगाथा' या महत्त्वाकांक्षी हिंदी चित्रपटात ही जोडी छत्रपती शहाजीराजे भोसले आणि राजमाता जिजाऊ यांच्या भूमिकेत दिसणार आहे. भाऊसाहेब आरेकर यांनी चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे तर दिग्दर्शन अजय-अनिरुद्ध यांनी केले आहे. ऐतिहासिक चित्रपटात एकत्रित काम करण्याचा योग या निमित्ताने जुळून आला असून या भूमिकेसाठी आम्ही तितकेच उत्सुक होतो, असं हे दोघे सांगतात. छत्रपती शहाजीराजे भोसले आणि राजमाता जिजाऊ यांची भूमिका करायला मिळणं आमच्यासाठी खूपच आनंददायी होतं. ज्या उत्तुंग व्यक्तिमत्वांनी आपला प्रेरणादायी इतिहास घडवला, समाजाला नवा विचार दिला, अशी भूमिका साकारताना सोबत मोठी सामाजिक जबाबदारी नक्कीच असते, असं प्रांजळ मत या दोघांनी व्यक्त केलं. पुरंदरच्या वेढ्याप्रसंगी झालेल्या धुमश्चक्रीत महान पराक्रम गाजवून शेकडो गनिमांना यमसदनी धाडणाऱ्या स्वामीनिष्ठ नरवीर मुरारबाजी देशपांडे यांचा पराक्रमी इतिहास आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. स्वराज्याच्या इतिहासात पुरंदरचे 'काळभैरव' म्हणून ओळख असणारे मुरारबाजी देशपांडे यांची यशोगाथा 'वीर मुरारबाजी...पुरंदरकी युद्धगाथा' या चित्रपटातून रुपेरी पडदयावर येण्यासाठी सज्ज होत असून लवकरच या चित्रपटाच्या प्रदर्शनाची घोषणा होणार आहे.

## रहिमाबी शेख यांचे निधन



बिडकीन दि ७ एप्रिल रहिमा बी गफुर शेख. वय ९३ वर्षे रा टाकार मोहल्ला बिडकीन ता पैठण यांचे वृद्धापकाळाने दि.६ एप्रिल रविवार रोजी संध्याकाळी सात वाजता दु:खद निधन झाले यांची दफनविधी रात्री अकरा वाजता पैठण रोडवरील हजरत निजामुद्दीन औलीया दर्गा कब्रस्तान मध्ये करण्यात आला त्यांच्या पश्चात एक मुलगा पाच मुली व सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे, शेख इलियास यांचे ते मोठ्या आजी होत.

## रामधन ठाकरे यांचे निधन



सोयगाव,दि.७ एप्रिल : तालुक्यातील बहुलखेडा येथील रामधन भागवत ठाकरे (वय.४७) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी वेळ दुपारी २ वाजता निधन झाले. त्यांचेवर सायंकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सुन,नातवंडे असा परिवार आहे. रुपेश ठाकरे,जिवन ठाकरे यांचे ते वडील होत.

## अग्रलेख...

# चीनचा पाकिस्तानला अटकाव

चीन, पाकिस्तान आणि बांगलादेश हे तीन देश भारताविरोधात आघाडी उघडत आहेत. दक्षिण आशियामध्ये भारताला शह देण्यासाठी चीन या दोन देशांना आर्थिक मदत करत आहे. असे असले, तरी हे दोन देश अंतर्गत प्रश्नांमुळे बेजार आहेत. चीनची ओळख पूर्वीपासूनच विस्तारवादाची राहिलेली आहे. चीनचे कर्ज घेऊन जगात अनेक देश दिवाळखोरीत निघाले आहेत. श्रीलंका हे त्याचे ताजे उदाहरण. या पृष्ठभूमीवर चीन व्यूहात्मकदृष्ट्या या देशांना मदत करत असला, तरी या देशांची आर्थिक लूट करायची आणि आपले मांडलिक बनवणे हा त्याचा हेतू आहे. शिवाय चीन लष्करी सामुग्रीच्या निर्यातीसाठी सावज शोधत होता. टोकाच्या भारतविरोधामुळे पाकिस्तान आणि बांगलादेश हे दोन सावज त्याच्या हाती लागले. अलिकडेच चीनने पाकिस्तानला दुसरी हँगोर-श्रेणी पाणबुडी दिली. या प्रकल्पामुळे पाकिस्तानी नौदलाला बळ मिळणार आहे. चीन पाकिस्तानला आधुनिक युद्धनौका, ड्रोन आणि लढाऊ विमानेही देत आहे. ही वाढती लष्करी आघाडी भारतासाठी धोकादायक ठरू शकते. कारण त्यामुळे दक्षिण आशियातील शक्तिसंतुलनावर परिणाम होऊ शकतो. चीन पाकिस्तानला शस्त्रास्त्रे आणि आर्थिक मदत करत आहे; पण तेथील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पाकिस्तानमध्ये चिनी नागरिकांवर अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. त्यात अनेक चिनी नागरिकांचा बळी गेला असतानाही चीनने पाकिस्तानसोबतचे संबंध घट्ट केले आहेत. चीनला आपल्या नागरिकांच्या सुरक्षेची काळजी आहे की केवळ सामरिक आणि आर्थिक फायद्यासाठी तो पाकिस्तानशी संबंध वाढवत आहे, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.

अमेरिका आणि पाकिस्तानचे संबंध आता पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अमेरिकेची लष्करी मदत कमी झाल्यानंतर पाकिस्तान पूर्णपणे चीनवर अवलंबून आहे; मात्र काही घटनांनंतर अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांमध्ये काहीशी सुधारणा होण्याची शक्यता निर्माण झाली असली तरी चीनवर असलेले पाकिस्तानचे अवलंबित्व अमेरिका-पाक संबंध पूर्वीसारखे मजबूत होऊ देणार नाही. पाकिस्तान आता चीनकडून ४० जे-३५ ए लढाऊ विमाने खरेदी करण्याचा विचार करत आहे, जे स्टेल्थ तंत्रज्ञाने सुसज्ज असतील. पाकिस्तानची अर्थव्यवस्था आधीच संकटात असताना हा करार त्यासाठी आर्थिक बोजा ठरू शकतो. भारतही या वाढत्या धोक्याबाबत सतर्क असून, आपली लष्करी ताकद वाढवत आहे. भारताने फ्रान्सकडून राफेल विमाने खरेदी केली असून, अमेरिकेसोबत लढाऊ विमानांची इंजिने विकसित करीत आहे. याशिवाय भारत इस्रायल आणि रशियासोबतही आपले लष्करी संबंध मजबूत करीत आहे. अमेरिकेने अलिकडेच पाकिस्तानच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमावर निर्बंध लादले. त्यामुळे अमेरिकाही चीन-पाकिस्तान युतीबाबत सावध असल्याचे स्पष्ट होते. भारत आपल्या सुरक्षेबाबत पूर्णपणे सतर्क आहे आणि या वाढत्या लष्करी आघाडीवर बारीक लक्ष ठेवून आहे. चीन भारताविरुद्ध राजनैतिक षडयंत्र रचत आहे, पाकिस्तानी लष्कराला शस्त्रास्त्रे देत आहे.

पाकिस्तानने आठ पाणबुड्यांसाठी चीनसोबत पाच अब्ज डॉलर्सचा करार केला होता. पाकिस्तानी नौदलाला बळकट करून ते स्वतःच्या कामासाठी वापरण्याची चीनची योजना आहे. पाकिस्तानचे सैन्य मजबूत झाले तर त्याचा फायदा चीनलाच होईल. त्याचबरोबर या युद्धनौका आणि पाणबुड्यांच्या मदतीने तो भारताला आव्हान देऊ शकतो. चीन गेल्या पाच वर्षांपासून पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा पुरवठा करणारा देश बनला आहे; मात्र सध्या पाकिस्तान अमेरिकेसोबतचे संरक्षण संबंध सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. नुकतेच 'इस्लामिक स्टेट-खोरासान'चा दहशतवादी मोहम्मद शरीफउल्लाला पाकिस्तानने अमेरिकेच्या हवाली केले. त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानचे कौतुक केले होते. २०२१ मध्ये काबुल विमानतळावर झालेल्या हल्ल्यात या दहशतवाद्याचा हात होता. त्यात १७० अफगाण आणि १२ अमेरिकन सैनिक मारले गेले होते. एका अहवालानुसार, चीनने गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानला ८१ टक्के लष्करी उपकरणे पुरवली आहेत. चीनच्या एकूण शस्त्रास्त्रांच्या निर्यातीपैकी हे प्रमाण ६३ टक्के आहे. चीन आणि पाकिस्तानमधील मजबूत संबंधांमुळे भारत आणि अमेरिकेतील संबंध मात्र दृढ होत आहेत. दक्षिण आशियातील सत्ता-संतुलनासाठी अमेरिकेला भारताची गरज आहे. पाकिस्तानला आधुनिक शस्त्रे देऊन चीन एका दगडात दोन पक्षी मारत आहे. एकीकडे त्याला पाकिस्तानसारखा देश मिळाला आहे, जो सदैव त्याची शस्त्रे खरेदी करण्यास तयार असतो. त्या बदल्यात त्याला चांगले बजेट मिळत असते, तर दुसरीकडे तो भारतावर राजनैतिक दबावही आणतो. अमेरिका आणि चीनमध्ये आधीच स्पर्धा आहे. चीनने पाकिस्तानला बळ दिले तर अमेरिकेचा प्रभाव कमी होऊ शकतो असे अमेरिकेला वाटते. त्यामुळे अमेरिका त्यावर लक्ष ठेवून आहे. चीन प्रत्येक प्रकारे आपला 'आयर्न ब्रदर' मजबूत करत आहे. शस्त्रे, तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि तळ या बाबतीत पाकिस्तानला चीनची मदत मिळते. त्यामुळे पाकिस्तानची लष्करी ताकद खूप वाढली आहे; पण हे फक्त मैत्रीसाठी नाही. चीनचेही स्वतःचे फायदे आहेत. त्याला भारत आणि इतर देशांवर दबाव आणायचा आहे. तसेच त्याला समुद्रात ताकद वाढवायची आहे. हे सर्व पाहून अनेक देश चिंतेत आहेत. आगामी काळात चीन आणि पाकिस्तानमधील ही भागीदारी कुठपर्यंत जाते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे परिसरात शांतता राहील की तणाव वाढेल, हा एक मोठा प्रश्न आहे. चीनच्या शस्त्रांवर पाकिस्तानचे अवलंबित्व सर्वश्रुत आहे. तथापि, 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या अलिकडील अहवालात या अवलंबित्वाचे प्रमाण उघड झाले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीमध्ये चीनचा वाटा ८१ टक्के आहे. मागील कालावधीतील ७४ टक्क्यांपेक्षा तो जास्त आहे. उभय देशांमधील वाढत्या लष्करी भागीदारीमुळे इस्लामाबादची संरक्षण क्षमता बळकट झाली आहे; पण याचा फटका पाकिस्तानला हळूहळू जाणवत आहे. पाकिस्तान दीर्घकाळापासून स्वदेशी संरक्षण उत्पादनासाठी संघर्ष करत असून, अनेकदा आपल्या लष्करी गरजा पूर्ण करण्यासाठी बाह्य पुरवठादारांकडे वळतो. म्हणजे तो स्वत: काही करू शकत नाही आणि लष्कराच्या गरजा भागवण्यासाठी चीनवर आपले अवलंबित्व वाढवत आहे. चीनसोबत अनेक वर्षांचे सहकार्य असूनही पाकिस्तानचा देशांतर्गत शस्त्र उद्योग चीनच्या तंत्रज्ञान आणि उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. जेएफ-१७ फायटर जेटसारखे मोठे प्रकल्पदेखील मोठ्या प्रमाणावर चिनी घटक वापरून तयार केले जातात. हाच पॅटर्न नौदल आणि क्षेपणास्त्र प्रणालींमध्ये विस्तारित आहे. त्यात पाकिस्तान लांब पल्ल्याच्या टोही ड्रोन, टाईप ०५४ ए मार्गदर्शित क्षेपणास्त्र फ्रिगेट्स आणि ६०० पेक्षा जास्त व्हीटी-४ लढाऊ रणगाडे आयात करतो.

चीनची शस्त्रे घेऊन पाकिस्तान स्वतःच्या लष्करी क्षमतेत विविधता आणण्याच्या क्षमतेवर मर्यादा घालत आहे. लष्करी सामुग्रीसाठी एकाच देशावर अवलंबून राहण्याचा सर्वांत मोठा धोका म्हणजे धोरणात्मक लवचीकता नसणे. भविष्यात चीनचे प्राधान्यक्रम बदलले किंवा दोन्ही देशांमध्ये आर्थिक किंवा राजकीय तणाव निर्माण झाला, तर पाकिस्तान गंभीर परिस्थितीमध्ये सापडेल. अमेरिका एके काळी पाकिस्तानचा प्रमुख शस्त्रास्त्र पुरवठादार होता; पण चीनची जवळीक ही पाकिस्तानसाठी धोक्याची सूचना आहे. पाकिस्तानच्या आण्विक कार्यक्रमाबद्दल आणि अतिरेकी गटांशी व्यवहार करण्याच्या चिंतेमुळे अमेरिकेने इस्लामाबादला होणारी लष्करी विक्री हळूहळू कमी केली आहे. परिणामी, पाकिस्तानचे अमेरिकेसोबतचे लष्करी संबंध हळूहळू कमकुवत होत गेले. त्यामुळे पाकिस्तान चीनवर अधिक अवलंबून राहू लागला. चीनचे धोरणात्मक प्राधान्य बदलले किंवा चीनने लष्करी मदतीच्या बदल्यात पाकिस्तानला अटी घालायला सुरुवात केली, तर पाकिस्तान अडचणीत येईल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# ट्रम्प यांचे नवे जग!

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर साऱ्या जगाला हादरविणारा 'टेरिफ' नावाचा बॉम्ब फोडला. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा म्हणजे १९४७ मध्ये अमेरिका आपल्या देशात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर जो कर आकारीत होती, त्याच दराने आता अमेरिका आयातित वस्तूंवर कर लावणार आहे. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिलपासून लागू केलेल्या नव्या आयात शुल्कांचे थोडक्यात हे आकलन आहे.

**स्थिती १९४७ ची :** १९४७ मध्ये अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर ८ टक्के कर आकारला जात होता. १९६० येता येता हा कर किंचित कमी होत ७ टक्के झाला. १९७३ मध्ये तो ४ टक्के झाला. १९८६ मध्ये ३.५ टक्के. १९९९ मध्ये २ टक्के, २००९ ते २०१५ या काळात तो २ टक्क्यांहूनही कमी होत पुन्हा २ टक्के झाला. २०२५ पर्यंतही त्यात फार वाढ झाली नाही. आता ट्रम्प यांनी घोषित केलेले नवे आयात कर दर १९४७ च्या स्तरावर नेणारे ठरणार आहेत. आणि याला ट्रम्प यांनी 'अमेरिकेचा मुक्तिदिन' असे म्हटले आहे.

**मंदी येणार? :** राष्ट्रपती ट्रम्प यांना आपल्या देशातील औद्योगिक उत्पादन वाढवायचे आहे. यासाठी त्यांनी आयात केल्या जाणाऱ्या वस्तू महाग करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या मोठ्या प्रमाणावर त्यांनी आयात कर लावण्याची घोषणा केली आहे, त्याने आयात केल्या जाणाऱ्या वस्तू महाग होणार हे ठरले आहे. याचे व्यापक परिणाम केवळ अमेरिकेत नाही तर जगावर होणार आहेत. अमेरिकेत आयातित वस्तू महाग होणार म्हणजे अमेरिकन नागरिक त्या वस्तू खरेदी करताना दोनदा विचार करतील. फार आवश्यक असेल तर खरेदी करतील अन्यथा खरेदी करणार नाहीत. म्हणजे अमेरिकन अर्थव्यवस्थेत एक प्रकारची मंदी येणार आहे. दुसरा परिणाम म्हणजे ज्या देशातून या वस्तू आयात केल्या जातील, त्यांची आयात कमी होईल. कारण, या वस्तू महाग झाल्याने, त्या वस्तूंना अमेरिकेत मागणीच राहणार नाही वा ती कमी झालेली असेल.

अमेरिकेच्या प्रत्येक राष्ट्रपतीने आपल्या देशात रोजगार वाढविण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत. ट्रम्प यांनी मात्र यासाठी आयात कर वाढविण्याची अति जहाल उपाययोजना केली असल्याचे दिसते. ट्रम्प यांच्या या निर्णयाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर कोणता व कसा परिणाम होतो हे सारे जग श्वास रोखून पाहात आहेत. ट्रम्प यांनी जगाच्या अर्थव्यवस्थेत हे व्यापारयुद्ध सुरू केले असताना त्यांनी लष्करी आघाडीवर आणखी काही नव्या आघाड्या सुरू करण्याची तयारी चालविली असल्याचे दिसते. आपण सत्तेवर येताच २४ तासांच्या आत युक्रेन युद्ध समाप्त झालेले असेल अशी दर्पोक्ती त्यांनी केली होती. नंतर काय झाले हे जगासमोर आहे. कधी ते युक्रेनच्या राष्ट्रपतींना धमकी देतात तर कधी रशियाच्या राष्ट्रपतींना धमकावतात. आता त्यांच्या डोक्यातून युक्रेनचा विषय बाजूला पडला असल्यासारखे दिसते. त्यांनी हमास, इराण यांच्या विरोधात युद्ध सुरू करण्याची भाषा सुरू केली आहे.

**नजर ग्रीन लॅण्डवर :** राष्ट्रपती ट्रम्प यांची नजर युक्रेन आणि ग्रीन लॅण्ड या दोन देशांमध्ये असलेल्या दुर्मिळ खनिज संपत्तीवर आहे. युक्रेनशी त्यांना तसा सौदा करावयाचा होता. दुर्मिळ खनिज संपत्ती असेलला भूभाग अमेरिकेच्या ताब्यात असल्यास रशिया त्यावर कब्जा करण्याचा प्रयत्न करणार नाही असा त्यांचा युक्तिवाद होता. आता त्यांना ५७ हजार लोकसंख्या असलेला ग्रीन लॅण्ड हा भाग ताब्यात हवा आहे. तीनशे वर्षांपासून ग्रीन लॅण्ड डेन्मार्कच्या ताब्यात आहे. डेन्मार्क स्वतः लहानसा देश आहे. त्याचा एक स्वयंशासित भाग म्हणजे ग्रीन लॅण्ड. या भागाने अमेरिकेत यावे अशी ट्रम्प यांची योजना आहे . एकतर ग्रीन लॅण्डने सरळसरळ अमेरिकेत सामील व्हावे वा मग किमान डेन्मार्कशी संबंधविच्छेद करीत स्वतःला स्वतंत्र घोषित करावे आणि अमेरिकेशी मैत्री करावी असे दोन प्रस्ताव ट्रम्प यांनी या देशासमोर ठेवले आहेत. ग्रीन लॅण्डमध्ये अतिशय मौल्यवान अशी खनिज संपत्ती असल्याचे मानले जाते.

**२०३७ पर्यंत राष्ट्रपती? :** राष्ट्रपती ट्रम्प यांचा कार्यकाळ सुरू होऊन फक्त अडीच महिने झाले आहेत. म्हणजे त्यांचा पावणे चार वर्षांचा कार्यकाळ बाकी असताना त्यांच्या समर्थकांनी ट्रम्प यांची तिसरी टर्म, चौथी टर्म यांची चर्चा सुरू केली आहे. अमेरिकेन कायद्यात कोणताही राष्ट्रपती दोनपेक्षा अधिक वेळा राष्ट्रपतिपदावर राहू शकत नाही. बिल क्लिंटन, रोनाल्ड रेडन हे राष्ट्रपती लोकप्रियतेच्या शिखरावर असताना पायउतार झाले होते. कारण त्यांना तिसऱ्यांदा निवडणुक लढविता येत नव्हती. आणि अमेरिकेत ट्रम्प यांचे रेटिंग म्हणजे त्यांची लोकप्रियता झपाट्याने घसरत असताना त्यांचे समर्थक २०३७ पर्यंत ते या पदावर कसे राहतील याचा युक्तिवाद करू लागले आहेत हे विशेष.

**चीनचा फायदा? :** अमेरिकेत राष्ट्रपती ट्रम्प यांचा जो थयथयाट सुरू आहे त्याचा थेट फायदा चीनला होईल असे आता मानले जात आहे. 'द न्यू कोल्ड वॉर' या रॉबिन निब्लेट यांच्या पुस्तकात नव्या शीतयुद्धाचे फार नेमके विवेचन - विश्लेषण करण्यात आले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका- सोवियत युनियन व आताचा रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले व काही दशकांपूर्वी ते संपलेही. आता सुरू होत असलेले शीतयुद्ध अमेरिका व चीन यांच्यात आहे असे प्रतिपादन या पुस्तकात करण्यात आले आहे. अमेरिका आता पूर्वीची अमेरिका राहिलेली नाही आणि दुसरीकडे चीन हा काही रशिया नाही असे सांगताना पहिल्या शीतयुद्धाचा आधार शस्त्रास्त्रांची स्पर्धा हे होते. ते फक्त युरोपपुरते मर्यादित होते असे सांगताना लेखकाने दुसऱ्या शीतयुद्धाचा आधार आर्थिक संपन्नता, तंत्रज्ञान हा राहणार असल्याचे सांगत हे शीतयुद्ध खऱ्या अर्थाने जागतिक असेल असे म्हटले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेले पहिले शीतयुद्ध प्रामुख्याने युरोपवर वर्चस्व कुणाचे यावर केंद्रित होते तर आता सुरू होत असलेल्या दुसऱ्या शीतयुद्धाची व्याप्ती जगावर वर्चस्व कुणाचे या स्पर्धेतून सुरू होत असल्याचे प्रतिपादन लेखकाने अतिशय प्रभावीपणे आपल्या पुस्तकात केले आहे. आर्थिक सुबत्ता, लष्करी ताकद, तंत्रज्ञान या तीन निकषांवर अमेरिका आजवर जगावर आधिपत्य गाजवीत होती, त्याला प्रथमच आव्हान मिळत आहे. तत्कालीन सोवियत युनियनकडून असे आव्हान कधी मिळाले नव्हते, चीनकडून मात्र ते मिळत आहे. आर्थिक सुबत्ता वगळता चीन आता अमेरिकेच्या बरोबरीत आला आहे आणि 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'चा विचार करता चीनने सध्या तरी अमेरिकेला मागे टाकले आहे असे लेखकाने म्हटले आहे.

सोवियत युनियनला आव्हान देण्यासाठी अमेरिकेने नाटो नावाचे व्यासपीठ तयार केले आणि अगदी मागील राष्ट्रपती ज्यो बायडेनपर्यंत सारे राष्ट्रपती हे व्यासपीठ बळकट करण्याचा प्रयत्न करीत होते. पण, आता राष्ट्रपती ट्रम्प यांनी केवळ नाटोच नाही तर आपल्या सर्व मित्रांचा वाऱ्यावर सोडून दिले आहे आणि दुसरीकडे चीन मात्र जागतिक राजकारणात आपले स्थान बळकट करण्यासाठी अनेक देशांना आपल्या सोबत जोडत आहे. कधीकाळी कॅनडा, जपान, इटली, ब्रिटन हे देश अमेरिकेचे कट्टर समर्थक मानले जात होते. आणि आता ट्रम्प याच देशांना धमकावत आहेत, अपमानित करीत आहेत.

**सुवर्णयुग की...:** अमेरिकेत आपल्या धोरणांनी सुवर्णयुग अवतरणार असल्याचे ट्रम्प सांगत असताना अनेक विश्लेषक मात्र ट्रम्प यांच्या पतनाचे भाकीत वर्तवीत आहेत. जगप्रसिद्ध अशा 'टाईम' पाक्षिकाचे मुखपृष्ठ नेहमीच चर्चेचा विषय ठरत आले आहे. टाईमच्या ताज्या अंकाचे मुखपृष्ठ आहे. व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्रपतींच्या खुर्चीवर ट्रम्प नाही तर त्यांचे उद्योगपती मित्र एलन मस्क विराजमान आहेत. या एका छायाचित्राने अमेरिकेचे सध्याचे चित्र जगासमोर आणले आहे.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने

आधुनिक काळात गतिमान आयुष्यात सर्वांची जीवनशैली बदललेली असताना जागतिक स्तरावर आरोग्य दिनाचे महत्त्व अधोरेखित होते. ७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस सामूहिक कृती, शिक्षण आणि प्रत्येकासाठी आरोग्याचे महत्त्व वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा आहे. अनेक गंभीर आरोग्य समस्या अजूनही दुर्लक्षित आहेत. लोकांना त्याचे धोके आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती नाही. जागतिक आरोग्य दिन या विषयांवर प्रकाश टाकतो. या दिवशी चर्चासत्रे, संमेलनाच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती केली जाते. जागतिक आरोग्य दिन आरोग्याचा अधिकार हा मूलभूत मानवी हक्क म्हणून अधोरेखित करतो. आजचा दिवस केवळ जागरूकता वाढवण्याबद्दल नाही; तो एका विशिष्ट बदलासाठी प्रेरक आहे. जागतिक आरोग्य दिन सरकारे, स्वयंसेवी संस्था आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांमधील सहकार्याला प्रोत्साहन देतो, जागतिक आरोग्य साध्य करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे याची आठवण करून देतो.

हवामान बदल, वाढते प्रदूषण, अस्वच्छ पाणी, अस्वच्छता यामुळे आरोग्य समस्यांमध्ये वाढ होते. या सर्वांचा आपल्या देशापुरता विचार केला तर सर्वत्र प्रदूषण वाढलेले दिसते. उघडी गटारे, नाल्या, कारखान्यांचे प्रदूषित पाणी नद्यांमध्ये सोडले जाते. त्या पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता अनेक ठिकाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असल्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. गावखेड्यांमध्ये तर अजूनही शुद्ध पाणी मिळत नाही. अनेक ठिकाणी थातुरमातुर उपाय करून तहान भागविली जाते. याचा परिणाम लहान मुले, महिला, वृद्ध यांच्या आरोग्यावर होताना दिसतो. गावातील व शहरातील जलकुंभ वेळोवेळी स्वच्छ न होणे, त्यांची देखभाल न राखणे यामुळे अनेक जण दुर्धर विकारांचे बळी पडतात. शहरातही यापेक्षा वेगळी स्थिती नाही. अनेक सार्वजनिक ठिकाणी लोक स्वच्छतेचे कुठलेही नियम पाळत नाही. तोंडात खर्रा भरल्यानंतर आपण कुठे उभे आहोत याचे भान राखता थुंकणे, रस्त्यावर धूम्रपान करणे, या गोष्टींमुळे इतरांना काही त्रास होईल याची काळजी न घेणे, बरे याबद्दल काहीही खंत या लोकांना वाटत नाही. रेल्वेस्थानके, बसस्थानकांवर तर स्वच्छतेची पार वाट लावली जाते. तंबाखू, खर्रा खाल्ल्यानंतर अगदी रेल्वे किंवा बसमध्ये चढण्याच्या जागेवर थुंकीच्या पिचकाऱ्या



असतात. बसमध्ये बसल्यानंतरही अनेक प्रवाशांचा तोबरा भरलेलाच असतो. शेजारी कुणी महिला, ज्येष्ठ नागरिक बसले आहेत याचीही तमा शौकिनांना नसते. बस आगार म्हणजे अस्वच्छतेचे ठिकाण आहे. ठिकठिकाणी कचरा दृष्टीस पडतो. बसमध्ये प्रवास करताना अनेक चालक बसमध्ये पान खाऊन तेथेच पिचकाऱ्या मारताना अनेकांनी पाहिले आहे. तीच बस दुसरा चालक चालवतो. त्याचेही वर्तन तसेच. या सर्व गोष्टींमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते. यासाठी सर्वांनी स्वच्छतेचे पालन करणे, स्वच्छतेची सवय स्वतः आणि इतरांना लावणे आवश्यक आहे. त्याची सुरुवात घरातूनच केली पाहिजे. आपल्यासह लहान मुलांनाही त्याचे बाळकडू दिले पाहिजे. घर स्वच्छ ठेवणे, उन्हाळ्यात कूलरच्या टाक्या वरचेवर स्वच्छ करणे, साचलेली धूळ वरचेवर स्वच्छ करणे, कचऱ्याच्या बादल्या रिकाम्या झाल्या की स्वच्छ करणे, पाण्याच्या ठिकाणी कीटकनाशक फवारणी करणे अशा लहानसहान गोष्टींमुळे आपण निरोगी जीवन जगू शकतो आणि तसे संस्कार लहान मुलांवर करू शकतो. सार्वजनिक ठिकाणीही आपल्यामुळे कचरा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. वाहनांतून होणारे प्रदूषण टाळता आले तर आरोग्याच्या अनेक समस्या कमी होतील. अनेक ऑटो, दुचाकींमधून आरोग्याला हानिकारक धूर हवेत पसरतो. यावर नियंत्रण आणले तरी बऱ्यापैकी आपले आरोग्य चांगले राहू शकते. भारतीय समाज पूर्वीपासूनच निसर्गपूजक, स्वच्छतेचा पुरस्कार करणारा आहे. भारतीय लोकांनी सात्त्विक आहारालाच महत्त्व दिले आहे. पण पाश्चिमात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या आरोग्याला पोषक अन्न बाजूला करून तो स्वतःचे नुकसान करीत आहे आणि पुढच्या पिढीसाठीही आरोग्याच्या समस्या निर्माण करीत आहे. आपले आणि आपल्या भावी पिढीचे आरोग्य आणि आयुष्य चांगले ठेवायचे असेल तर आपल्याला वाढते वायुप्रदूषण, अस्वच्छ पाणी आणि सार्वजनिक ठिकाणची अस्वच्छता यावर नियंत्रण मिळवावे लागेल. त्यासाठी सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे याबाबत असलेल्या आचारसंहितेचा अवलंब कटाक्षाने करावा लागेल. तरच आपण आपले आणि इतरांचे आरोग्य चांगले ठेवू शकू.

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# रोमरोमात वसलेल्या रामा

प्रभू श्रीरामचंद्रांचे व्यक्तिमत्त्व हे आदर्श पुरुषाचे आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक गुण आहेत. परंतु त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व हे राजा राम या प्रभावाखाली असलेले आपल्याला दिसून येते. आज काही हजार वर्षे झालेली असली तरीही भारतीय समाज मनावरची रामाची, रामायणाची पकड काही कमी होताना दिसत नाही. राम या देशातील जनतेच्या रोमरोमात भिनलेला आहे.

माता कौसल्येने रामाला जन्म दिला परंतु कैकेयी व सुमित्रा यांना सुद्धा त्यांनी कौसल्येप्रमाणे सन्मान दिलेला आहे. रामाचा ज्यावेळेस युवराज्याभिषेक असतो त्यावेळेस मंथरा नावाची दासी कैकेयीच्या मनामध्ये विष कालवते. कैकेयीला दशरथ राजाकडून जे दोन वर मिळणार असतात त्यात रामाला १४ वर्षे वनवास व भरताला राज्य असे ती दशरथाला मागते. दशरथ राजा कैकेयीच्या या मागणीने व्यथित होतो. तो दुःखी कष्टी होऊन भूमीवर पडतो.त्यावेळेस सुमंत्र रामाला बोलावून आणण्यासाठी जातात. राम जेव्हा कैकेयीच्या महालात येतात तेव्हा त्यांना असे दिसते की पराक्रमी दशरथ राजा जमिनीवर पडलेला आहे. त्याचा मुकुट कुठेतरी दूर पडलेला आहे. त्याचे केस अस्ताव्यस्त झालेले आहे व त्याच्या शेजारी कैकेयी उभी आहे. हे दृश्य पाहिल्यानंतर राम दशरथाला काही विचारत नाही तर ते कैकेयीला म्हणतात की, माते, काय आज्ञा आहे. यावरून सुद्धा रामाची समयसूचकता आपल्याला दिसून येते की ज्या अर्थी दशरथ राजा भूमीवर पडलेला आहे त्याअर्थी तो कुठलाही निर्णय किंवा आज्ञा देण्यास सक्षम नाही. अशा वेळेस राम कैकेयीला दशरथाचा काय आदेश आहे असे विचारतात. कैकेयी रामाला म्हणते की, महाराज दशरथ मला दोन वर देणार होते. त्यातील एका वरापोटी मी तुझ्यासाठी १४ वर्षांचा वनवास मागितलेला आहे, तर दुसऱ्या वरापोटी भरतासाठी राज्य मागितले आहे. वास्तविक पाहता त्या दिवशी रामाचा युवराज्याभिषेक होणार असतो. अयोध्या नगरी सजलेली असते. सर्वत्र आनंदाचे वातावरण असते. राम सुद्धा स्वतःच्या युवराज्याभिषेकासाठी तयारी करीत असतात. परंतु असे असताना सुद्धा ते कुठलाही प्रतिवाद कैकेयीसोबत करीत नाही. दिलेली आज्ञा ते आनंदाने स्वीकारतात. त्या उलट लक्ष्मणाला जेव्हा ही



वार्ता समजते त्यावेळेस तो म्हणतो की, दशरथ राजा आता वृद्ध झालेला आहे. त्याला तुम्ही बंदिवासात टाका व अयोध्येचे राज्य करा. लक्ष्मण कैकेयीवर सुद्धा रागावतो. परंतु राम त्यालाही शांत करतात. कैकेयीमुळे रामांना वनवास भोगावा लागला, सीतेचे अपहरण झाले. रावणाशी त्यांना युद्ध करावे लागले. दशरथ राजा रामाच्या विरहामुळे मरण पावला. या सर्व दुःखद घटना एका कैकेयीमुळे निर्माण झालेल्या होत्या. तरीही रामाने तिला नेहमीच कौसल्येएवढा सन्मान दिला यावरून आपल्याला रामाचे मोठेपण लक्षात येते.

साधारणतः व्यक्तीवर आनंदाचे किंवा दुःखाचे प्रसंग आलेत तर तो या सर्व प्रसंगांमध्ये त्याच्या पत्नीला सुद्धा गृहीत धरतो. परंतु प्रभू रामचंद्रांनी वनवासात जाताना सीतेला गृहीत धरलेले नाही. राम सीतेला म्हणतात की, वनवासात जाण्याची आज्ञा मला मिळालेली आहे. त्यामुळे तू अयोध्येमध्येच राहा व माता कौसल्येची सेवा कर. परंतु सीता रामाला म्हणते की, जेथे राघव तेथे सीता. राम लक्ष्मणाला सुद्धा अयोध्येत थांबायला सांगतात. परंतु लक्ष्मण सुद्धा रामाला म्हणतो की, मी रामाची सावली आहे. जेथे राम राहतील तेथेच मीसुद्धा राहील. राम वनवासात जाताना कौसल्येला भेटतात. त्यांना माहीत आहे की, तिच्या मुलाला वनवास झाला. तिच्या मुलाचा युवराज्याभिषेक रद्द झाला. यामुळे तिच्या मनामध्ये निश्चितच काहीतरी प्रतिक्रिया निर्माण झाल्या असतील. तरीसुद्धा ते माता कौसल्येला म्हणतात की, तू भरताबद्दल कुठल्याही प्रकारची अढी मनामध्ये ठेवू नको. भरत राजा झाल्यावर त्याच्याबद्दल सुद्धा मनामध्ये कोणताही कटु भाव ठेवू नको. तू हे लक्षात ठेव की, भरत हा तुझा पुत्र असला आणि वयाने लहान असला तरी तो राजा आहे. त्याच्या आज्ञेचे पालन करणे हा सगळ्यांचा धर्म आहे. ज्यावेळेस राम वनामध्ये जायला निघतात त्यावेळेला संपूर्ण प्रजा सुद्धा त्यांच्या रथाच्या मागोमाग चालू लागते.अयोध्येची सीमा पार झाल्यावर राम सर्व नगरवासीयांना अयोध्येत परत जाण्याचा सल्ला देतात. परंतु त्यावेळेला सर्व अयोध्यावासी म्हणतात की, जेथे राम राहणार असेल तेथेच अयोध्यानगरी असेल. तुम्ही मनात राहणार असाल तर आम्ही वनातसुद्धा अयोध्या निर्माण करू.

रामाचे मोठेपण आपल्याला अनेक प्रसंगांमध्ये दिसून येते. वनामध्ये प्रवेश केल्यानंतर तेथे शृंगवेरपूर नावाचे गाव असते. तेथील राजा गुह हा वनवासी राजा असतो. तसे पाहिले तर राम हे सम्राट दशरथ यांचे सुपुत्र होते आणि त्याचे युवराज होते. असे असताना सुद्धा त्यांनी एका छोट्याशा वनातील राजाला फार मोठा सन्मान दिलेला आहे. राजा गुह त्यांना म्हणतो की, मी तुमचा दास आहे. राम त्याला म्हणतात, तू माझा मित्र आहेस. त्यामुळे वनातील एका सामान्य राजाला सुद्धा त्यांनी मित्रत्वाचा दर्जा दिलेला आहे.

रावण जेव्हा सीतेचे हरण करतो त्यावेळेस जटायू नावाच्या एका पक्ष्याला हे दृश्य दिसतं. त्यावेळेस तो रावणावर हल्ला करतो व त्याच्याशी युद्ध करतो. शेवटी रावण कपटाने त्याचे पंख कापून टाकतो व त्यानंतर जटायू जमिनीवर पडतो. ज्यावेळेस राम व लक्ष्मण सीतेचा शोध घेत व वनातून जात असतात त्यावेळेस त्यांना जटायू दिसतो. त्यांना सीतेचे हरण झालेले आहे व तिला रावणाने कोणत्या दिशेला नेले आहे हे सांगतो आणि जटायू प्राण सोडतो. आपल्या कार्यासाठी प्राण देणाऱ्या जटायूबद्दल राम कृतज्ञ असतात. ते जटायूचा अंतिम संस्कार करतात व त्याचे श्राद्धसुद्धा करतात. रामाने दशरथाच्या मृत्यूनंतर वनामध्ये दशरथाचे श्राद्ध केले परंतु सीतेकरिता प्राण देणाऱ्या एका पक्ष्याचे सुद्धा श्राद्ध त्यांनी केले.

जगाजवळ राम नाही व रामायणही नाही. ज्यांच्याजवळ कुठलेही अध्यात्म नाही असे लोक जगातील अनेक देशांमध्ये पसरलेले आहेत. परंतु ज्यांच्याजवळ जीवन जगण्याचे श्रेष्ठ तत्त्वज्ञान आहे असे लोक केवळ एका देशामध्ये आहेत व त्याही देशांमध्ये ते स्वतःचे तत्त्वज्ञान इतरांना सांगू शकत नाही अशी परिस्थिती आहे. याच देशातून एकेकाळी कल्पनांमागून कल्पना आणि आदर्शांमागून आदर्श जगाच्या विविध भागांत गेले होते आणि त्यांनी तेथील समाजजीवन व्यापून टाकले होते. आपली संस्कृती विश्वविजयी झाली पाहिजे यासाठी राम नामाचे हिरे-मोती सर्वत्र विखुरण्याची, देण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### भेसळखोरांना रोखा

बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिवेशनात केलेली घोषणा स्वागतार्ह आहे. बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळखोरांनी उच्छाद मांडला आहे. राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दूध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदयविकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉयझन आहे. हे स्लो पॉयझन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### स्विगी, झोमॅटो कंपन्यांना वेठीस धरा

स्विगी, झोमॅटो कंपन्यांमुळे खाद्य पदार्थ, किराणा माल, जीवनावश्यक वस्तू अगदी कमी वेळेत घरपोच मिळतात ही एक मोठी उपलब्धी आहे, याबद्दल वाद नाही. पण या कंपन्यांचे डिलिवरी पर्सन मात्र वेळेच्या प्रतिबंधामुळे वाहतूक नियमांची अक्षरशः पायमल्ली करतात. त्याचे कारण म्हणजे उशीर झाला तर कंपनी त्यांचे वेतनकपात करते. त्यासाठी ते आपला आणि इतरांचा देखील जीव धोक्यात घालतात. इतर नागरिक देखील नागपरात वाहतक नियम आजकाल पाळत नाही हा तर विषयच वेगळा झाला. पण कंपनीच्या धोरणामुळे इथे वाहतूक शिस्तीचे पालन होत नसेल तर त्यांना वेठीस धरून कंपनी धोरण बदलवून घ्यायला हवे. नाहक वेतनकपातीच्या धारेवर या कंपनीचे तरुण रायडर्स जेव्हा गर्दीच्या वेळी देखील सिग्नल तोडतात अथवा रॉंग साईड गाडी चालवतात, तेव्हा वाहतूक व्यवस्था कोलमडण्याची फार जास्त शक्यता निर्माण होते. यावर काही प्रतिबंध लवकरच यावे, अशी अपेक्षा आहे.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### प्राथमिक शाळांच्या परीक्षा भर उन्हाळ्यात

राज्य मंडळाच्या सर्व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी शासनाकडन चक्क एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्याचा मुहूर्त काढण्यात आला आहे. दरवर्षी वर्ग पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सुरू होऊन दुसऱ्या आठवड्याच्या शेवटपर्यंत संपते. विद्यार्थ्यांचे वय, आरोग्य, शाळांमधील भौतिक सुविधा व राज्यातील विशेषतः विदर्भातील एप्रिल महिन्यातील तापमान तसेच शाळा लक्षात घेता परीक्षेकरिता हा कालावधी योग्य आहे. परंतु शासनाकडून यावर्षीच्या परीक्षेसाठी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्याचा मुहूर्त ठरवून सर्वांना चकित केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे कडून संकलित मूल्यमापन चाचणी २ व नियतकालिक मूल्यमापन चाचणी (पॅट) परीक्षेचे वेळापत्रक व सूचनापत्र निर्गमित करण्यात आले. त्यानुसार इयत्ता आठवी व नववीची परीक्षा ९ एप्रिलला सुरू होणार आहे तर इयत्ता सहावी, सातवीची परीक्षा १९ एप्रिलला, तर पहिली व दुसरीची परीक्षा मात्र २३ एप्रिलला सुरू होणार आहे. एवढेच काय लगेच १ मे ला निकाल सुद्धा जाहीर करायचा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शाळांतील बहुवर्ग अध्यापन पद्धती लक्षात घेता हे काम शिक्षकांसाठी जिकरीचे ठरणार आहे .

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये

अवकाळी पाऊस, वादळ, वाऱ्याने राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे, फळबागांचे, कांद्याचे फार मोठे नुकसान झालेले आहे. या नैसर्गिक आपत्तीने पिकांचे व फळबागांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सहानुभूती दाखवून त्याच्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना अर्थिक मदतीबाबत सहानुभूती दाखविण्याऐवजी शासनाच्या आर्थिक मदतीचा वापर लग्न, शुभकार्य व इतर घरकामासाठी शेतकरी करतात, असे मंत्र्याने जाहीरपणे सांगणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. यापुढे राज्याच्या कोणत्याही पदाधिकारी किंवा प्रतिनिधीने असे मन दुखावणारे वक्तव्य करू नये अशी सक्त ताकीद मुख्यमंत्र्यांनी सर्वांना द्यावी अशी अपेक्षा.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

रामनगर साखर कारखाना प्रकरण

# याद राखा गाठ माझ्याशी, एकालाही सोडणार नाही! - आ.अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना मंठा रोडवरील रामनगर येथे बंद असलेला जालना रामनगर सहकारी साखर कारखाना शासनाच्या नियमाप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करून सध्या शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या ताब्यात आहे. पण या प्रकरणी या कारखान्याच्या राजकारणामध्ये कोणी मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करू नये असा गंभीर इशारा आमदार अर्जुन खोतकर यांनी दिला आहे.

सदरील कारखान्याची परिस्थिती गंभीर असत्यांनी याकडे कोणी लक्ष दिले नाही. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हा कारखाना बंद आहे. त्यामुळे कामगारांची देणे ही थकलेले आहेत. एकूणच या परिस्थिती संदर्भात अनेक वेळा आंदोलने झाली आणि ती शांतही झाली. परंतु पुन्हा काल गुरुवार दिनांक ३ रोजी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या भागामध्ये कारखान्याचे तत्कालीन कामगार आणि शेतकऱ्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्याच्या प्रतिउत्त-रामध्ये आज आमदार अर्जुन खोतकर म्हणाले, कालपासून पुन्हा माझी खोटी बदनामी करणे सुरू केलेआहे. ही बदनामी मी सहन करणार नाही याद राखा गाठ माझ्याशी आहे मी एकालाही सोडणार नाही. कारखान्यातून रस्ता जाऊ द्यायचा किंवा नाही तो माझा प्रश्न आहे आणि आता तर रस्ता जाऊच देणार नाही. त्यांनी फक्त कामगारांच्या देणे देण्यापुरतं बोलायला हवं होतं. कोणाला कुठे दाबायचं हे आपल्याला चांगलं माहित आहे. तसेच हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे न्यायालयाचा आदर करणे व मी जास्त याविषयी बोलणार नाही असे शेवट आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले.

# जिल्ह्याच्या विकासात उद्योजकांचा महत्वाचा वाटा -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यात सुक्ष्म, लघू आणि मोठे उद्योगांनी जिल्ह्यात विविध प्रकारचे उद्योग सुरु करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रासोबत सुमारे २ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. जालना जिल्ह्यात यामुळे उद्योग क्षेत्राला चालना मिळणार असून जिल्ह्याच्या विकासात उद्योजगांचा महत्वाचा वाटा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित जिल्हा गुंतवणूक परिषद-२०२५ मध्ये डॉ. पांचाळ हे बोलत होते. विभागीय सहसंचालक बी.टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सरनीकर, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहायक आयुक्त श्री. चिमणकर, आकाश ढगे यांच्यासह सामंजस्य करार केलेले उद्योजक यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, एका देशाची अर्थव्यवस्था ही दूसऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडलेली असते. आपल्या उद्योजकांचे देशाला आर्थिक चालना देण्यासाठी नेहमी महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. तसेच शासन आणि प्रशासन हे उद्योजकांसाठी सदैव उद्योजकांना कोणताही त्रास न होता व्यवसाय करण्याची सोयी सहज आणि सोप्या पध्दतीने उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करत आहे. जिल्हा उद्योग केंद्र जालना यांच्या सोबत टोमोबाईल, फुड प्रोसेसिंग, स्टील तसेच इतर औद्योगिक क्षेत्रातील ४६ सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या आणि विशाल उद्योजकांनी सुमारे २ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहे. यामुळे जिल्ह्यात लवकरच मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. नूकत्याच दावोस येथे पार पडलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम मध्ये मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई, पुणे आणि नाशिक नंतर उद्योग क्षेत्राचा विस्तार हा छत्रपती संभाजीनगर आणि आजूबाजूच्या परिसरात होणार असल्याचे सांगितले. यामुळे येणाऱ्या काळात या परिसरात मोठे उद्योग निर्माण होवून येथे रोजगाराच्या संधी वाढणार आहेत. जिल्ह्यातील उद्योजकांनी आपला स्वतंत्र ब्रॅन्ड निर्माण करावा. तसेच लघु,सुक्ष्म, मध्यम उद्योजकांना सहकार्य देखील करावे. याकरीता जिल्हा प्रशासन उद्योजकांना सकारात्मक सहकार्य करेल. उद्योजकांनी देखील सामाजिक भान ठेवून आपल्या उद्योगांचा विकास करावा असेही डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले. सहसंचालक बी.टी. यशवंते म्हणाले की, जिल्ह्यातील उद्योजकांना प्लेटफॉर्म निर्माण होण्यासाठी तसेच उद्योगाशी निगडीत शासनाच्या विविध योजना, जिल्ह्याची भौगोलिक परिस्थितीनुसार उद्योग निर्मिती या उद्देशाने या परिषेदेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रास्ताविकात जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सरनीकर म्हणाले की, जिल्ह्यातील उद्योजकांना उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूकदारांना आकर्षीत करुन गुंतवणूकदार व व्यवसाय यांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याकरीता जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२५ वे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्याला विकासाचा केंद्र बिंदू मानून जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा या गुंतवणूक परिषदेचा उद्देश आहे. प्रांरभी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते उद्योजकांना सामंजस्य कराराच्या प्रति वितरीत करण्यात आल्या. यावेळी परिषदेमध्ये जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्र, गुंतवणूकीच्या संधी, इतर क्षेत्रातील गुंतवणूक व व्यवसायातील संधी या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले. यावेळी परिषदेस जिल्ह्यातील उद्योजक आणि जिल्हा प्रशासनातील विविध विभाग प्रमुखाची उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### संतांच्या सहवास व नामस्मरणाने जीवन सुधारून जगण्याचा मार्ग सापडतो –ह.भ.प.कार्तिक महाराज घाडगे



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

संतांच्या सहवास व नामस्मरणाने जीवनमान सुधारून जगण्याचा मार्ग सापडतो जीवनाच्या अवघड रस्त्यांनी वाटचाल करत असताना हा रस्ता सोपा करण्यासाठी संतांची संगत व नामस्मरण आवश्यक असल्याचे निरूपण हभप युवा कीर्तनकार कार्तिक महाराज घाडगे यांनी केले.

जाफराबाद तालुक्यातील देव ळेगव्हाण येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पहिल्या दिवशीचे पुष्प गुफतांना ते बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,जीवनात आलेल्या प्रत्येकाला मृत्यूला सामोरे जावे लागणार आहे.प्रत्येकाची वेळ ठरलेली असून जीवन हा पाण्याचा बुडबुडा आहे,कधी कोलमडून पडेल याचा नेम नाही त्यामुळे आपले कर्म व नियत साफ ठेवून इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न आपल्याकडून झाला पाहिजे. ते म्हणाले की या जगात साधू संतांचे विशेष महत्त्व असून धरती,सूर्य ,चंद्र, नदी,वृक्ष ,समुद्र हे परोपकारासाठी असून यांच प्रमाणे मानव देह प्राप्त मानवाने सुद्धा परोपकारी वृत्ती ठेवल्यास जीवन साध्य झाल्याशिवाय राहणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. गंगा पार करायची असेल तर पोहणे आवश्यक आहे,तसेच मनुष्य जिवन जागे ठेवायचे असेल तर ज्ञानाची कास धरणे गरजेचे आहे.आयुष्याच्या परीक्षेत तुम्हाला पास व्हायचे असेल तर माणसे ओळखायची शिकुन तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचा कळकळीचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.या कार्यक्रमाला गावकऱ्यांची ,महिलांची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती या भव्य दिव्य होत असणाऱ्या कीर्तन सोहळ्यात युवा कीर्तनकार श्री कार्तिक महाराज घाडगे यांनी गावातील वैकुंठवासी नाना महाराज पंडित यांनी सुरू केलेल्या देळेगव्हाण ते पायी दिंडी सोहळ्याचे गुणगान गात त्यांच्यामुळे आज गावातील शेकडो महिला व पुरुष दरवर्षी प्रमाणे पायी दिंडी सोहळा उत्साहात करत आहेत. त्यामुळे गावकरी पंचक्रोशीतील लोकांच्या वतीने वैकुंठ वासी नाना महाराज पंडित यांचे आभार मानत पंडित परिवाराचे कौतुक केले.

### राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष पदी अंजेभाऊ चव्हाण यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील पाहेगाव येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते अंजेभाऊ चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.ही निवड राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष धर्मनेता किसन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भिकन जाधव,अँड.पंडित राठोड,महाराष्ट्र प्रदेश महासचिव उमेश राठोड यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्ष विलास राठोड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र व शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी श्रीकांत राठोड,राजाराम पवार,अजय पवार,संदीप राठोड आणि भारतातील अनेक राज्यातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने पोहरादेवी येथे उपस्थित होते.

# रोजगार मेळाव्यातून ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जालना व मत्स्योदरी शिक्षण संस्था अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ एप्रिल, २०२५ रोजी बेरोजगार तरुणांसाठी जालना येथील मत्स्योदरी शिक्षण संस्था अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळावा पार पडला. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

या रोजगार मेळाव्यात ०८ नामांकित कंपनीचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मुलाखतीतून ८४ उमेदवारांची विविध पदाकरिता प्राथमिक निवड केली. यात प्रीम सोल्यूशन प्रा. लि. (सलाम किसान) जालना ०८, प्रीम सोल्यूशन प्रा. लि. जालना ०३, कलश सीड्स प्रा. लि. जालना १५, एस.बी.आई इन्शुरेंस कंपनी लि. जालना ११, राजुरी स्टील्स टी एम टी बार्स प्रा. लि. जालना १६, प्रथम एजुकेशन फाउंडेशन छ. संभाजीनगर १०, रिध्दी सिध्दी सर्व्हिसेस, जालना ०७, भाग्य लक्ष्मी रोलींग मिल्स प्रा. लि. जालना १४ याप्रमाणे उमेदवारांची निवड केली आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. माधव ढेरे यांनी केले तर आभार सुरेश बहुरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे तसेच डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदिप डोळे, सुभाष पंडित, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, अमर तुपे, निर्मल बिडकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. संजय पाटील उप प्राचार्य, डॉ. संतोष करवंदे, डॉ. रामनाथ सांगळे, डॉ. कार्तिक गवांडे, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. रामदास वैद्य यांनी तसेच महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

परतुर मध्ये उत्साहात रामनवमी उत्सव साजरा

# जगाला हेवा वाटावे असे प्रभू रामचंद्रांचे मंदिर, नरेंद्र मोदी सरकारच्या काळातच झाले -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

प्रभू रामचंद्र हे आमच्या आस्थेचा विषय असून, आज रामनवमीच्या निमित्ताने संपूर्ण परतुर शहरांमध्ये राम नामाचा जयघोष ऐकून मन आनंदित झाले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथे आयोजित रामनवमी उत्सव मिरवणुकी च्या प्रारंभ प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की लाखो करोडो हिंदूंची अपेक्षा होती ते आयोध्या मध्ये प्रभू रामचंद्राचे मंदिर व्हावे ते स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्यात उतरवले असून यामुळे संपूर्ण भारत वर्षाला आनंद झाला असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. गेल्या ४० वर्षांमध्ये मी परतूर शहरात एवढी भव्य दिव्य मिरवणूक प्रभू रामचंद्रांची बघितली नसल्याचे सांगतानाच आपले मन या मिरवणुकीमुळे आनंदित असून एकोप्याचा रामनवमी हा उत्सव असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे ते म्हणाले की कार सेवक म्हणून आपण स्वतः कार सेवेत सहभाग नोंदवला होता, याचा अभिमान असून गेल्या कित्येक वर्षापासून ची हिंदूंची इच्छा पूर्ण झाली असल्याने



संपूर्ण देशभरात रामनवमीचा उत्साह अतिशय जोरदार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम आमच्या जीवनाचा आदर्श असून त्यांच्या आदर्श असून त्यांचे आदर्श जीवन चरित्र रामायणाच्या माध्यमातून त्या सर्वांच्या हृदया हृदयापर्यंत पोहोचलेली असल्याने खऱ्या अर्थाने भारततील जनता संस्कारक्षम असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. दरम्यान माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करून माल्या अर्पण करत प्रभू रामचंद्राची भव्य दिव्य मिरवणूक सुरू करण्यात आली या मिरवणुकीतील ढोल पथक गोंधळी, पारंपारिक वेशभूषा घातलेले महिला पुरुष भगव्या पताका भगवे ध्वज सर्वांचे लक्ष आकर्षित करून घेत होते अनेक ठिकाणी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती तर अनेकांनी आपापल्या घरावरून या मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करत राम जन्मोत्सव साजरा केला. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, सुभाष अण्णा अंभोरे अर्जुन जगताप, सावता काळे, भगवानराव मोरे दया काटे, शत्रुघन कणसे, संपत टकले रमेश भापकर, सुधाकर सातवणकर प्रवीण सातोणकर , संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, ओम मोर अमोल अग्रवाल , अमर बगडिया अजित पोरवाल, रंगनाथ येवले, सनी तनपुरे संतोष हिवाळे विजय यादव, विकास बोडखे, गोपी ठाकूर, आनंद कोटीच्या विठ्ठल कुलकर्णी सचिन काटे, राजेंद्र मुंदडा अमोल शहाणे, कैलास चव्हाण प्रमोद राठोड, नरेश कांबळे सोनवा अग्रवाल ज्ञानेश्वर जईद दिगंबर मुजमुले, सनी तनपुरे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला पुरुष भक्तांची उपस्थिती होती

# अवैध लाकूड वाहतूक करताना ट्रॅक्टर पकडला



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

दिनांक -०६-०४-२०२५ रोजी गोपनीय माहितीच्या आधारे मौजे तळणी ते मंठा रस्त्यावर अवैधरित्या कडुलिंब प्रजातीच्या लाकडाची वाहतूक करताना ट्रॅक्टर क्रमांक चह -२१-उ- -०५४८ या क्रमांकाचे ट्रॅक्टर व ट्रॉली मुद्देमाला सह जप्त करण्यात आले असून आरोपी शुभम संतोषराव बोराडे यांच्या विरुद्ध भारतीय वन अधिनियम- १९२७ तसेच महाराष्ट्र वृक्ष अधिनियम- १९६४ नुसार वन गुन्हा क्रमांक ढ - ०३/ २०२५ दिनांक ०६-०४-२०२५ अन्वेय वन गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे सदर कारवाई मा . वन संरक्षक छत्रपती संभाजीनगर श्री प्रमोदचंद लाकरा व मा . उप वनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर श्रीमती सुवर्णा माने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वन संरक्षक (रोहयो व वन्यजीव ) जालना एस एन मुंडे व वनपरिक्षेत्र अधिकारी जालना दक्षिण (प्रादेशिक ) श्री व्ही एम दौंड यांच्या नेतृत्वात वनपाल मंठा श्री विकास अवचार, वनरक्षक उसवद कू . आर बी बनसोडे यांनी संयुक्तरित्या केली

# कोट्यावधीची उलाढाल सुरू असलेल्या सट्टा बुक्की चालकावर कारवाई होणार का?

## सत्ताधारी पक्षातील तालुकाप्रमुख यास राजकीय बळ अवैध सट्टा-मटका चालविण्यासाठी दिले जाते का? असा पक्ष नेत्यांना नागरिकांचा सवाल?



आयपीएल क्रिकेट सट्टा भाग - २

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मागील महिन्यापासून सुरू असलेल्या क्रिकेट सट्यावर मंठा शहरांमध्ये कोट्यावधीची उलाढाल दररोज होत आहे.तरी देखील या प्रकरणी आजपर्यंत एक सुद्धा कार्यवाही झाली नसल्याने बुक्की चालक व एजन्सी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याप्रकरणी काल प्रसिद्ध केलेल्या बातमीच्या अनुषंगाने बातमीने काही फरक पडत नाही , काय छापायचे छापा अशा प्रतिक्रिया सट्टा बुक्की चालकाकडुन त्यांच्या एजंटला असा दिलासा देण्यात येत आहे. खरंच या सट्टा बुक्की चालकावर पोलीस प्रशासन कार्यवाही का करत नसेल असा देखील प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**उद्याच्या अंकात सट्टा चालकांचे मोबाईल नंबर फ्लॅश करण्यात येणार**

याप्रकरणी काही सुज्ञ नागरिक लवकरच गृहमंत्री कार्यालय व विभागीय आयुक्त तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देणार आहेत.

मंठा शहरात आयपीएल क्रिकेट च्या सामन्यात अंदाजीत स्कोर यावर कमी पैशात जास्त पैशांचे आमिष दाखवून मोबाईलच्या माध्यमातून सुरू आहे. परभणी जिल्ह्यातील सेलू शहरातील राजकीय वलय असलेला सट्टा-बुकी चालक याच्यामार्फत मंठ्यातील तालुकाप्रमुख त्याचा भाऊ व मित्र परिवार असे एकूण ७० एजंटची टोळी तयार केली आहे. सट्टा चालविण्यासाठी वेगवेगळ्या मोबाईल नंबरचा वापर करण्यात येतो. सदर मोबाईल नंबर हे दुसऱ्याच्या नावावर घेतलेले असतात. सदर मोबाईल नंबर पोलिसांनी ट्रॅक करून कॉल हिस्टरी काढल्यास नक्कीच याचा शोध लागेल परंतु यावर पोलीस प्रशासन का कार्यवाही करत नसेल असा प्रश्न सुज्ञ नागरिकांना पडला आहे. या आयपीएल क्रिकेट सत्यामुळे शहरातील अनेक तरुण बरबाद झाले आहेत तर काही तरुण निराशावादी झाले असून शहर सोडून जाण्याच्या तयारीत आहेत. आई-वडिलांची मायापुंजी या सत्यापाही गमावली असून काहींनी बायकोची डाग दागिने वडिलोपार्जित जमीन देखील गमावली आहे. सट्टाबुक्की चालक एजंट हे जास्त पैशाचे आम्हीच दाखवून मंठा शहरांमध्ये दररोज सायंकाळी वेगवेगळ्या तीन ते चार ठिकाणी मोबाईल फोनवर सट्टा घेतात. याप्रकरणी संबंध विभागाकडून कार्यवाही होत नसल्याने राजरोसपणे त्यांचे तरुणांना बरबाद करण्याचे काम सुरू आहे. आता याप्रकरणी नागरिक गृहमंत्री कार्यालय विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती देखील प्राप्त झाली आहे.

> "आयपीएल क्रिकेट सट्टा मध्ये मंठ्यातील तरुण वर्ग फार मोठ्या प्रमाणावर आहारी गेला आहे. कमी पैशाला जास्त पैशाची लालच देऊन याकडे तरुण वर्ग वळला जात आहे. अनेक तरुण यामध्ये बरबाद झाले आहेत त्यामुळे प्रशासनाने यावर कार्यवाही करावी
> **-विजेश वाघमारे मंठा**

## संक्षिप्त वृत्त...

### मुलाची भेट घडवा वडिलांनी दिले निवेदन

**पाथरी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील बाबुलतार येथील वयोवृद्ध रहिवासी भागोजी नामदेव डोंगरे यांनी पाथरी पोलीस स्टेशनला एक अर्ज दिला असून या अर्जामध्ये माजी व मुलाची भेट घडून देण्याची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की माझा मुलगा नातेवाईकांनी लपवून ठेवला आहे व मला त्याची भेट घेऊ दिली जात नाही यामध्ये माझी सून व त्यांचे नातेवाईक समाविष्ट असून त्यांनी कट कारस्थान करत माझ्या मुलाला माझ्यापासून दूर केले आहे मुलगा डॉक्टर असून देखील मला त्याची भेट घेऊ दिली जात नाही याप्रकरणी भागोजी नाम देव डोंगरे यांनी दिनांक २७ जानेवारी रोजी पाथरी पोलीस स्टेशनला एक अर्ज दिला आहे परंतु यावर अद्याप कुठलीही कारवाई झाली नाही यामुळे याप्रकरणी पाथरी पोलीस यांनी कार्यवाही करावी नसता मला वरिष्ठाकडे दाद मागावी लागेल असे देखील नमूद करण्यात आले आहे या निवेदनामध्ये सतीश सदावर्ते महेश सदावर्ते कैलास सदावर्ते मारुती सदावर्ते गुंफाबाई आधीवर डोंगरे यांनी आरोप केले आहेत व न्याय देण्याची मागणी केली आहे.



### पोलिस अधीक्षक कार्यालयात वॉटर कुलरचे उद्‌घाटन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात सोमवारी (दि.७) वॉटर प्युरीफायर वॉटर कुलरचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनातून पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेरील परिसरात भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांकरिता तसेच कार्यालयातील अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी याकरिता वॉटर प्युरीफायर वॉटर कुलर बसविण्यात आले . सोमवारी (दि.७) पोलीस अधीक्षक परदेशी यांच्या हस्ते या वाटर कुलचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी पोलीस उपाधीक्षक (गृह) अनिरुद्ध काकडे, सहायक पोलीस निरीक्षक साईप्रकाश चन्ना, पोलीस निरीक्षक मुंडे, कर्मचारी दिलीप सावंत, ओमप्रकाश कोटरवार, अन्वरखान पठाण यांच्यासह सर्व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

### आशविनकुमार शेंडगे याची 'इस्त्रो युवकांसाठी निवड

परभणी,/प्रतिनिधी : गंगाखेड येथील रहिवाशी अशविनकुमार विनोद शेंडगे याची 'इस्त्रो युथ इनोव्हेटर प्रोग्राम २०२५' या विज्ञान प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली .

देशभरातून ३४८ विद्यार्थ्यांची या शिबिरासाठी इस्रोने निवड केली असून त्यात महाराष्ट्रातील केवळ दहा विद्यार्थ्यांची निवड झाली . त्यात अशविनकुमार विनोद शेंडगे याचा समावेश अत्यंत उल्लेखनीय . ही महाराष्ट्रासाठी अत्यंत गौरवाची बाब ठरली . निवड झालेल्या शिबिरार्थींसाठी इस्त्रो प्रशिक्षण शिबिर आयोजित करून शिबिरार्थींना मार्गदर्शन करते. अशविनकुमारने आजपर्यंत टेक्नोशियन वर्ल्ड कप रोबो रेस, शालेय राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धा, भारत सरकारच्या टपाल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या दीनदयाळ स्पर्श स्कॉलरशिप योजना यात उल्लेखनीय चमक दाखविली .

त्याला या स्पर्धेसाठी युरेका टीम गोवाचे भूषण, पालक विनोद शेंडगे, अश्विनी शेंडगे यांनी मार्गदर्शन केले. या विशेष यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होते .

### काचीगुडा एक्स्प्रेसमध्ये तीन आरक्षित डब्यांची वाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेवून काचीगुडा-नगरसोल- काचीगुडा एक्स्प्रेस मध्ये एक आरक्षित वातानुकुलीत खुर्चीयान आणि दोन दुसऱ्या श्रेणीची आरक्षित खुर्ची यान डब्यांची कायमस्वरूपी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागने दिली.

७ एप्रिल रोजी काचीगुडा येथून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६१ काचीगुडा-नगरसोल व ८ एप्रिल रोजी नगरसोल येथून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६२ नगरसोल- काचीगुडा एक्स्प्रेस मध्ये एक आरक्षित वातानुकुलीत खुर्ची यान आणि दोन आरक्षित दुसऱ्या श्रेणीची खुर्ची यान डब्यांची कायमस्वरूपी वाढ करण्यात येणार .या गाडीच्या डबे वाढी नंतर या गाडी मध्ये १७ जनरल, ०२ आरक्षित दुसऱ्या श्रेणी ची खुर्ची यान (चेयर कार), एक आरक्षित वातानुकुलीत खुर्ची यान (एसी चेयर कार) आणि दोन एसएल आर आसे एकूण २२ डबे असतील. या गाडीचे आरक्षण ५ एप्रिलपासून उपलब्ध होईल याची प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने केले .

### टरमाईन इंजेक्शनची विक्री करणाराविरुध्द गुन्हा दाखल

#### इंजेक्शनच्या ३० बॉटलसह दुचाकी जप्त

परभणी,/प्रतिनिधी : झटपट शरिरयष्टी कमविण्यासाठी जीम मधील तरुणांना टरमाईनसारख्या घातक इंजेक्शनची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरुध्द येथील नवा मोंढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला .

शेख महेबुब शेख माजीद हा व्यक्ती औषध विक्रीचा परवाना नसतांनासुध्दा प्रतिबंधित टरमाईन इंजेक्शन जीम मधील तरुणांना विक्री करण्यासाठी स्वतःजवळ बाळगतांना आढळून आला. पोलिसांनी कस्तुरबा गांधी विद्यालय मैदान परिसरात ४ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता या व्यक्तीविरुध्द कारवाई करीत त्याच्याजवळील १० हजार रुपये किमतीच्या टरमाईन इंजेक्शनच्या ३० बॉटल आणि एक दुचाकी असा एकूण ६० हजारांचा मुद्देमाल जप्त . औषध निरीक्षक मनोज पैठणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी शेख महेबुब शेख माजीद याच्याविरुध्द नवा मोंढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला .

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पूर्णा तालुक्यात अवैध वाळू , माती यांचे उत्खनन

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी:-** तालुक्यातील कातनेश्वर महसूल मंडळात मागील अनेक दिवसापासून अवैध रेती व मातीचे उत्खनन केले जात असून या प्रकाराकडे संबंधित मंडळाधिकारी व तलाठ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

पूर्णा तालुक्यातील कातनेश्वर येथील महसूल मंडळातील पिंपळगाव बाळापुर,कौडगाव, संदलापूर ,माटेगाव आदी परिसरातून मोठ्या प्रमाणात वाळूची अवैध वाहतूक व मातीचे उत्खनन केले जात असून या प्रकाराकडे महसूल विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे तालुक्यातील संदलापूर येथील गट नंबर ९ मध्ये मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात मातीचे अवैध उत्खनन केले जात असून सदर मातीही समृद्धी मार्गासाठी वापरली जात असल्याचे चित्र आहे तसेच पिंपळगाव बाळापुर, कौडगाव, माटेगाव आदी भागातून दररोज वाळूचे अवैध उत्खनन करून वाळूची सर्रासपणे वाहतूक केली जात आहे या मंडळातील मंडळाधिकारी व तलाठी हे मुख्यालयास न राहता परभणी येथून जाणे येणे करून आपला कार्यभार चालवत असतात सध्या या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे अवैध मातीचे उत्खनन मोठ्या प्रमाणात होत आहे तसेच तालुक्यातील गौर येथील गट क्रमांक ४१२ मध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात मातीची व मुरमाचे अवैध उत्खनन केले जात असून या ठिकाणी अंदाजे ३५ ते ४० हजार ब्रास मुरूम व दगड उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे अशाप्रकारे तालुक्यात विविध ठिकाणी वाळू व मातीचे अवैध उत्खनन केले जात आहे.





### इटोली येथे पाणपोईचे उद्‌घाटन अजिंक्य स्टोन क्रेशरचा आगळावेगळा उपक्रम

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या ईटोली येथे कै. बाबाराव घुगे यांच्या स्मरणार्थ व रामनवमीचे औचित्य साधून अजिंक्य स्टोन क्रेशर चा आगळावेगळा उपक्रम साधून अजिंक्य स्टोन क्रेशर ला चार वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बालाजी सांगळे यांनी गेल्या वर्षी जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची दोन हौदाची व्यवस्था केली होती परंतु परंतु नागरिकांना पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून रविवारी सकाळी ९:०० वाजता अजिंक्य स्टोन क्रेशर चे मालक बालाजी सांगळे यांनी थंड पिण्याचे पाणी कै. बाबारावजी घुगे यांच्या स्मरणार्थ व रामनवमी चे औचित्य साधून पाणपोईचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गोविंदराव थिटे ट यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामीण भागातील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी हा उपक्रम राबविला . जगदीश घुगे सरपंच इटोली,संतोष राठोड सरपंच साईनगर, राजेश राठोड सरपंच गणेश नगर आनंदराव राठोड सरपंच घडोळी अशोक घुगे रामकिशन घुगे बापू आप्पा कोदरे माधु मामा जाधव बंडू होणा पांडुरंग मेनकुदले शरद आपा तीलकरी भूषण गडदे शिवाजी खुणे संतोष घुगे माऊली घुगे विश्वनाथ राऊत गोविंद राऊत अशोक नारायण पुणे दत्ता निंबाळकर परमेश्वर स्वामी श्रीधर नागरे गणेश तिळकरी वसंत निंबाळकर लोभा नाईक राठोड सुदाम राठोड कोंडीबा शेळके मनोहर केंद्रे आश्रुबा ठोके संतोष वाघ यांचा काळूराम चव्हाण व सर्व नागरिक ईटोलीयेथील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर.पी.हॉस्पीटल येथे एका तासात ६ महिलांना जीवनदान- सहा प्रसुती यशस्वी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील आर.पी. हॉस्पिटलमध्ये एका तासात सहा प्रसूती यशस्वी करण्यात आल्या आहेत. अत्यांत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करुन एका तासात ६ महिलांना जीवनदान देण्यात आले .





अवकाळी पाऊसामुळे जिल्हा महिला रुग्णालयात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गर्भवती महिला यांची प्रसूती करण्यास अडथळे निर्माण झाले . गर्भवती महिला रुग्णापैकी काही महिला रुग्णाची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना तात्काळ डिलिव्हरी (प्रसूती) ची आवश्यकता होती. सदरील महिला रुग्णा पैकी ६ गर्भवती महिला रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना तात्काळ परभणी येथील अत्याधुनिक यंत्रणा असलेल्या आर.पी हॉस्पिटलमध्ये मध्यरात्री सुमारे १२ वाजता दाखल करण्यात आले . हॉस्पीटल मधील सर्व डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी तत्काळ नियोजन करून एका तासाच्या कालावधीत ६ प्रसूती यशस्वीरीत्या मोफत केल्याबद्दल आ.राहुल ट यांनी सर्व डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

सदरील प्रसूती ह्या एकाच वेळी हॉस्पीटल मधील ६ ऑपरेशन थेटर मध्ये करण्यात आल्या. यातील ४ गर्भवती मातांची तब्येत जास्त नाजूक असल्याने प्रसूती दरम्यान गर्भवती स्त्रियाच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी झाल्यामुळे त्यांना हॉस्पीटल मधील ब्लड बँक मार्फत रक्त देण्यात आले. तसेच एका गर्भवती मातेने दोन जुळ्या बालकांना जन्म दिला असून या बालकांचे वजन कमी असल्याने आणि त्यांची तब्येत नाजूक असल्यामुळे बालरोग तज्ञ डॉ. अजय गिरी व डॉ.बाबासाहेब गायकवाड यांनी नवजात अर्भकाना हॉस्पिटल मधील अत्याधुनिक मध्ये दाखल करून त्यांचा जीव वाचवला.

हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी आणि कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या कार्यकुशलतेमुळे सर्व नवजात बालके आणि त्यांच्या मातांची प्रकृती स्थिर असून येणाऱ्या काळात प्रसूती माता मृत्यू दर रोखण्यासाठी आर.पी. हॉस्पीटल हे सक्षमपणे आपली प्रमुख भूमिका बजावणार असल्याचे आर.पी. हॉस्पीटल चे अधिष्ठाता डॉ.प्रमोद शिंदे यांनी सांगितले.

## निम्न दुधना प्रकल्पावर आढळला तपकिरी डोक्याचा कुरव- महिति पक्षी निरीक्षक ढाकणे

**शिवाजी आकात**

**सेलू ,/प्रतिनिधी-** शहरापासून जवळच असलेल्या वाकडी धरणावरील निम्न दूधना प्रकल्पावर तापकीरी डोक्याचा कुरव (ब्राऊन हेडेड गुल) हा समुद्रीपक्षी आढळून आल्याची माहिती पक्षी निरीक्षक विजय ढाकणे यांनी दिली. माधव गव्हाणे व डॉ शरद ठाकर यांच्यासह रविवार (दि ०६ एप्रिल) रोजी त्यांनी वाकडी धरणाच्या दरवाजाजवळ पक्षी निरीक्षण केले असता त्यांना हा तपकीरी डोक्याचा कुरव पक्षी दोनच्या संख्येने आढळून आला. तपकिरी डोक्याचा कुरव हा काळ्या डोक्याच्या कुरवपेक्षा मोठा असतो. डोक्याचा अर्धा भाग फिकट तपकिरी रंगाचा, शरीर फिकट राखाडी, चोंच आणि पाय गडद लाल रंगाचे असतात. शेपटीचा टोकाचा भाग आणि दोन्ही पंखाच्या टोकाचा भाग काळसर असतो. हा जलचर, पाणथळी पक्षी असल्याने सतत पाण्यावर तरंगल्यासारखा वाटतो. पाण्याखाली डोके बुडवून पाण्याच्या पृष्ठभागावरून शिकार करतो. पाण्यातील किटक, गांडुळे, समुद्री अपृष्ठवंशिय प्राणी आणि धान्य देखील खातो.



तपकिरी डोक्याचा कुरव दलदलीच्या वसाहतीमध्ये किंवा तलावातील बेटावर प्रजनन करतो. त्याचे घरटे त्र जमिनीवर असते. मध्य आशियातील उंच पठारावर ताजीकीस्तानापासून ते मँगोलियातील ऑर्डो स पर्यंत हा प्रजनन करतो. हा स्थलांतरित पक्षी असल्याने भारतीय उपखंडातील समुद्री किनाऱ्यांवर आणि मोठ्या तलावावर हिवाळा घालवतो. वसाहतीने राहून गोंगाट करणारी ही एक प्रजाती . कुरव हा तसा समुद्राच्या काठावर राहणारा पक्षी . स्थलांतर करणारे अनेक पक्षी बऱ्याचदा भरकटतात. त्यामुळे आपल्या भागात ते दिसतात. यापूर्वी तौते वादळामुळे भरकटलेला छोटा चोरकावळा जिंतूर तालुक्यातील येलदरी जलाशय परिसरात दिसला .विजय ढाकणे पक्षीनिरीक्षक पेज ४ बॅनर

एम ५ व एम ६ असे दोन्हीही लावा

निम्न दूधना प्रकल्पावर आढळला तपकिरी डोक्याचा कुरव

पक्षी निरीक्षक विजय ढाकणे यांची माहिती

## पाथरीत रामनवमी निमित्त डॉ.मानवतकर यांचा सत्कार

**पाथरी,/प्रतिनिधी :** पोलिस मित्र समिती तालुका अध्यक्ष महेश यु जोशी बाभळगावकर यांनी समाजातील आदर्श ,अतिशय प्रेमळ व वैद्यकीय क्षेत्रातील निस्वार्थ सेवा देणारे पाथरीचे सर्वात जुने एम.बी.बी.एस डॉक्टर एल आर मानवतकर यांचा आज पोलिस मित्र समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला .

डॉक्टर मानवतकर साहेब यांचे नाव मोठया आदराने आणि कृज्ञतापूर्वक घेतले जाते एक अतिशय गुणवान आणि करुणामय डॉक्टर म्हणून गेली ४० - ४५ वर्षा पासुन ते पाथरी तालुक्यात अतिशय माफक दरात सातत्यपूर्ण सेवा देत आहेत, गरजूंना अतिशय कमी दरात वैद्यकिय सेवा देणे ही त्यांचें वैशिष्ट्य असुन आज वैद्यकीय व्यवसायात जास्तीत जास्त पैसे कमावण्याची स्पर्धा लागलेली असतांना डॉ. मानवतकर साहेब यांचे कार्य समाजाला आदर्श व प्रेरणा देणारे आहे.त्यांना मानणारा तालुक्यात मोठा वर्ग असुन एक प्रेमळ डॉक्टर म्हणून ते सर्वत्र प्रसिद्ध . श्रीराम नवमीचे औचित्य साधून महेश जोशी यांनी त्यांचा घरी जाऊन सत्कार केला.



## गोसावी समाजाच्या विकासासाठी कटिबध्द राहणार- आ.बांगर

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर येथे संत हिरामण गिरी माहाराज जागृत देवस्थान जिंतूर येथे दिनांक २ एप्रिल रोजी श्री संत हिरामण गिरी महाराज यांची जयंती पार पडली दिनांक २ एप्रिल रोजी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गोसावी समाज जिंतूर येथे हजारोंच्या संख्येने दाखल झाला.

संत हिरामण गिरी महाराज जागृत देवस्थान नवसाला पावणारे हिरामण गिरी महाराज यांची जयंती निमित्त कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार माननीय संतोष रावजी बांगर व वसमत विधानसभा मतदारसंघाचे तरुण व तडफदार आमदार राजू भैया नवघरे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी भाषणावर



कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार संतोष बांगर हे आपल्या भाषणात म्हणाले की गोसावी समाज हा मागासलेला असून या समाजाचा विकास झालेलाच नाही तरी या समाजाच्या विकासासाठी मी कटिबद्ध राहणार असे ते म्हणाले व गोसावी समाज हा दारोदारी जाऊन मागून खात असतो त्यामुळे या समाजाकडे कोणत्याही राजकीय मंडळीने लक्ष न दिल्यामुळे हा समाज मागासलेला आहे यामुळे नवीन पिढीने शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे त्यामुळे समाजातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी शिक्षण घेतलेच पाहिजे व मोठमोठ्या पदावर आपण विराजमान व्हा असे आमदार संतोष बांगर म्हणाले तसेच संत हिरामण गिरी महाराज जागृत देवस्थान जिंतूर या देवस्थानला २५ १५ या निधी अंतर्गत हिरामणगिरी महाराज जागृत देवस्थानला २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे ते म्हणाले यावेळी राजू नवघरे यांचे सुद्धा मनोगत व्यक्त करणे झाले त्यांनी सुद्धा समाजाच्या पाठीशी आपण खंबीरपणे आहे असे म्हणाले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोसावी समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून महिला व पुरुष हजाराचे संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम दुपारी दोन वाजता संपन्न झाला नंतर त्या ठिकाणी समाजाच्या वतीने महाप्रसाद ठेवण्यात आला होता महाप्रसाद घेण्यात नंतर आयोजकाच्या वतीने कार्यक्रम संपला असे जाहीर झाले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक गिरी महाराज गणेश गिरी महाराज शिवाजी गिरी महाराज मोहनजी चव्हाण महाराज लक्ष्मणजी गिरी राजे जीगरी ज्ञानेश्वर चव्हाण रितेश जिगरी कृष्णा चव्हाण हरीजी मुळे सुरेश जी बागणे सुदर्शन गिरी राजेश गिरी यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपस्थित होते.

# दारू पिऊन त्रास देणाऱ्या मुलाचा आईनेच केला खुन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०७ एप्रिल**

सतत दारू पिऊन घरात वाद घालणाऱ्या मुलाचाच आईने खुन केल्याची घटना भोकर तालुक्यातील धावरी येथे दि. ५ एप्रिल रोजी घडली. या प्रकरणी आईला ताब्यात घेण्यात आले आहे. भोकर तालुक्यातील धावरी येथील बालाजी नागा राऊत हा दररोज दारू पिऊन वाद घालत असे दारूच्या नसेत त्याने अनेक वेळा आई व पत्नीला मारहाण केली होती. त्याच्या या त्रासाला कंटाळून त्याची पत्नी



देखील माहेरी निघून गेली होती. दि. ५ एप्रिल रोजी बालाजी राऊत हा नेहमी प्रमाणे दारू पिऊन आला. यावेळी त्याने पुन्हा आईशी वाद घालण्यास सुरवात केली. आईला संताप अनावर झाल्याने धारधार शस्त्राने त्याच्यावर वार केले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान या प्रकरणी बालाजी राऊत यांनी भोकर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. घटनेची माहिती कळताच अप्पर पोलीस अधिक्षक खंडेराय धरणे, पोलीस उपअधक्षिक डॅनियल बेन, पोलीस निरीक्षक अजित कुमार यांनी घटनास्थळी धाव घेत नागाबाई राऊत यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. तसेच त्यांना अटक देखील करण्यात आली आहे. दारू पिऊन त्रास देणाऱ्या मुलाचा आईनेच खुन केल्याच्या घटनेमुळे भोकर तालुक्यात हळबळ उडाली आहे.

# नांदेडकरांना मुबलक आणि वेळेवर पाणीपुरवठा करा

## आ. बालाजीराव कल्याणकर यांनी घेतली महानगरपालिकेत आढावा बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०७ एप्रिल**

वाढता उन्हाळा आणि पाणीटंचाई नांदेड शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत महानगरपालिका प्रशासनाने नांदेडकरांना मुबलक आणि वेळेवर पाणीपुरवठा करावा यासाठी सांगवी येथील पर्यायी उद्धवाचाही उपयोग करावा अशा सूचना आ. बालाजीराव कल्याणकर यांनी दिले आहेत. महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज आ. कल्याणकर यांनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्याचा व अन्य कामाचा आढावा घेतला . यावेळी त्यांनी मनपाच्या प्रशासनाला या



सूचना केल्या आहेत. नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कारभाराला अधिक गती देण्यासाठी आणि जनतेला वेळेवर पाणीपुरवठा व्हावा या अनुषंगाने आ. बालाजीराव कल्याणकर हे सातत्याने प्रयत्न करत आहेत. गेल्या काही दिवसापासून नांदेड शहरातील उत्तर भागात वेळेवर पाणीपुरवठा होत नसल्याची ओरड नागरिकांमधून होत आहे. त्यामुळे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी आज महानगरपालिकेत आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि संबंधित विभागाची बैठक घेतली. या बैठकीत येथे कोटीतीर्थ येथे एक्सप्रेस फडर उभारण्यात येणार असल्याने महानगरपालिकेच्या पाण्याच्या आणि लाईटचा प्रश्न कायमचा मिटेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला आयुक्त डॉक्टर महेश कुमार डोईफोडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम , इंजिनिअर प्रकाश कांबळे , पाणी पुरवठा विभाचे अभियंता , शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे ,मुकुंद जवळगावकर , महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर , माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख , संदीप महाराज , श्याम कोकाटे , धम्मा कदम , उमेश दिघे आदींची उपस्थिती होती.

**गुंठेवारीला मुदत वाढ द्या**

गुंठेवारीला मुदत वाढ देण्याची मागणी नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे अंतर्गत मालमत्ताधारकांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या मालमत्तांच्या खरेदी विक्रीसाठी पुन्हा गुंठेवारीला मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी केली. या अनुषंगाने लवकरच मुदतवाढ दिली जाईल अशी माहिती आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे यांनी दिली आहे.

## संक्षिप्त वृत्त




### मुदखेड येथे भाजपाचा वर्धापन दिन साजरा

**मुदखेड-** येथील लक्ष्मी नारायण जिनिंग मैदान येथे दि.६ एप्रिल रोजी भाजपाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्ता दूरदृश (लाईव्ह) संबोधन दुपारी २ वाजता आयोजित केले होते. तत्पूर्वी भोकर विधानसभा आ. श्रीजया चव्हाण यांनी कार्यक्रमाचे उदघाट्न छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. शामाप्रकाश मुखर्जी, पंडित दीनदयाळ उपाध्याय, यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण व दीप प्रज्वलन करून केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ नेते गोविंदराव शिंदे नागेलिकर, प्रमुख वक्ते भासजपा चे जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड यांची भाजपा च्या वर्धापन दिनास अनुसरून समायोचित भाषणे झाली. यावेळी बोलतांना आ. श्रीजया चव्हाण म्हणाल्या की, भाजपा चे प्रथम अध्यक्ष भारतरत्न, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपयी आणि माजी केंद्रीय गृह मंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांचे खूप चांगले संबध होते चव्हाण साहेबांच्या अमृत मोहत्सवी सत्कार सोहळ्यास भाजपाच्या प्रथम अध्यक्ष असलेल्या नेत्याची उपस्थिती आणि त्यांनी डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या प्रामाणिक आणि वक्तशीर कर्तृत्वाचे केलेले कौतुक आजही आम्हाला कौटुंबिक ऋणानुबंध आठवून जाते. त्याच मुळे की, काय आज आम्ही चव्हाण कुटुंबीय भाजपा परिवाराचे सदस्य झालो आहोत. आता आपले कुटुंब मोठे झाले आहे.या मोठ्या भाजपा परिवारात खूप काही शिकण्यासारखे आहे. नेते देवेंद्र फडणवीस यांचे विधिमंडळातील राज्य घटने वरील भाषण खूप काही शिकण्यासारखे आहे. सर्व कार्यकर्त्यांनी ते भाषण आवर्जून ऐका असे आवाहन केले आणि राम नवमी व भाजपा स्थापना दिनाच्या उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष बालाजी खटिंग यांनी प्रास्ताविक मांडले तर तालुका महामंत्री सुदाम पाटील खानसोळे यांनी आभार मानले जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड यांनी त्याग समर्पण आणि बलिदान ही भाजपाची ओळख आहे. प्रखर राष्ट्रवादी एकता आणि अखंडता, लोकशाही, सकारात्मक पंथ निरपेक्षता, गांधी वादी समजवाद आणि शोषण मुक्त सामाजिक समता,मूल्य आधारित राजनीती ही भाजपाची पंच सूत्री व भाजपा सरकारची लोकोपयोगी निर्णय यावर प्रकाश टाकत. भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता हा सामाजिक न्यायाचा प्रतिनिधी म्हणून ओळखला जावा या करिता शासनाच्या योजना समाजातील शेवटच्या व्यक्ती पर्यंत पोहचविला पाहिजे असे कार्यकर्त्यांना आवाहन करून, स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तर अध्यक्षीय समारोपात गोविंदराव नागेलिकर यांनी खा.अशोक चव्हाण यांचा भाजपा प्रवेशाचा निर्णय अगदी योग्य होता याची खरी जाणीव आम्हाला होत असल्याचे सांगून, विकशित भारताचे स्वप्नात नांदेड जिल्ह्याचा विकास तेवढाच महत्वाचा समजून आम्ही विकासा सोबत असल्याचे सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्य संजय सोनटक्के, कानोबा बिस्मिले, प्रभाकर पांचाळ यांनी विशेष परिश्रम घेतले तर या कार्यक्रमास,जिल्हा उपाध्यक्ष शंकर मुतकलवाड,जिल्हा सचिव भगवान पानेवार,नांदेड कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक निलेश देशमुख, गांधी पवार,माजी जि.प.सदस्य गणेशराव शिंदे, भीमराव कल्याने,माजी सभापती लक्ष्मण जाधव, शत्रुगन गंड्रस,माजी नगराध्यक्ष सुनील शेटे, माधव कदम,गोविंद गोपनपल्ले, संजय आऊलवार, संजय चव्हाण, गुलाब सूर्यवंशी,गंगाधर डांगे,सतीश मुंगल, प्रवीण काचावार, गजानन कमळे,ऋषिकेश पारवेकर, कुणाल चौदंते,कालिदास जंगीलवाड, राजू बारतोंडे, मोहन कांजाळकर, आनंदराव शिंदे, माधव शिंदे, माधव कल्याणे, यासह आदी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

### करूणा बावस्कर यांचे निधन

**नांदेड-**येथील प्रभात नगर भागातील सौ. करूणा दीपंकर बावस्कर यांचे दि.६ एप्रिल रोजी रात्री एक वाजता निधन झाले. त्या ४९



वर्षाच्या होत्या. दिवंगतसौ.करूणा दीपंकर बावस्कर यांच्या पार्थिवावर दि. ७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नांदेड येथे गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. पत्रकार दिपंकर बावस्कर यांच्या त्या पत्नी होत.

### प्रा. राम शिंदे यांचा दौरा

**नांदेड-**महाराष्ट्र विधानपरिषदचे सभापती हे ९ एप्रिल २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता मुंबईहून नांदेड विमानतळ येथे आगमन. सकाळी ८.४५ वा. नांदेड विमानतळ येथून खाजगी हेलिकॉप्टरने सेलू, जि. परभणीकडे प्रयाण. सायंकाळी ५.१० वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व राखीव. सायं. ६ वा. नांदेड विमानतळ येथून खाजगी विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.

### डॉ. पंकज भोयर यांचा नांदेड दौरा

**नांदेड-**राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर हे आज नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ वाजता हैद्राबाद येथून शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव.

# जिरोना गावात डिजे व व्यसनमुक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती करण्याचा निर्धार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ०७ एप्रिल**

तालुक्यातील मौजे जिरोना या आदर्श गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती डिजे व व्यसनमुक्ततीत साजरी करण्या निर्णय घेण्यात आला आहे. दि. ६ एप्रिल २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीउत्सव समितीची निवड करण्यात आली. सोपान संभाजी तुपसाखरे याच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



सर्वानुमते जयंती मंडळाचे अध्यक्षपदी राजरत्न लक्ष्मण तुपसाखरे याची निवड करण्यात आली आहे. उपाध्क्षपदी दिनाजी सदबा काळे, सचिपदी शंकर तुपसाखरे , उतम रामजी काळे( सहसचिव) बालाजी पुंडलीक तुपसाखरे ( कोषाध्यक्ष) संघरत्न प्रकाश काळे(सहकोषाध्यक्ष) गणेश निवृती तुपसाखरे (संघटक) सोपान संभाजी तुपसाखरे (सहसंघटक) सटवाजी सोनबा काळे (सल्लागार) आर्जुन पुंडलीक तुपसाखरे (सह सल्लागार) आनंदा निवृती तुपसाखरे (सदस्य) गंगाधर ग्यानोबा खंदारे जावई(सदस्य) बालाजी चांदु तुपसाखरे(सदस्य) रमेश निवृती तुपसाखरे यांची निवड करण्यात आली आहे बैठकीत डिजे व व्यसमुक्त जयंती साजरी करण्याचा महत्वपूर्ण निर्णय डॉ बाबासाहेब आंबेडकर मंडळाने घेतल्याने जिरोणा समितीचे कौतुक करण्याजोगे आहे.

# लोह्यात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शांतात समितीची बैठक

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०७ एप्रिल**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व रामनवमी निमित्त लोह्याच्या पोलीस ठाण्यात उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक घेण्यात आली. पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या पुढाकाराने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस नायब तहसीलदार राजेश पाठक, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, माजी नगरसेवक करीम शेख, पंचशील कांबळे, भास्कर पाटील, गंगाधर महाबळे, गुन्हे शोध पथकाचे सदाशिव जामकर, गिरे, माजी पाणीपुरवठा सभापती अप्पराव पवार, पत्रकर सुरेश जोंधळे, हरिहर धुतमल, गोविंद कदम, इमाम लदाफ, निहाल अहमद, अनिल गायकवाड, डी एन कांबळे, यासह भीम जयंती मंडळाचे सदस्य उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांनी जयंती तसेच राम नवमी विषयी मार्गदर्शक सूचना केल्या. सामाजिक उपक्रम राबविण्या बाबत पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी मार्गदर्शन केले. सदाशिव जामकर यांनी बॅनर बाबत महत्वाच्या सूचना केल्या. या बैठकीत भास्कर पाटील पवार, पंचशील कांबळे, हरिहर धुतमल, गंगाधर महाबळे, डी एन कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सार्वजनिक भीम जयंतीच्या वतीने उपविभागीय अधिकारी संगेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी जगताप, पोलीस निरिक्षक आयलाने यांचा सत्कार केला. तसेच भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे ,गंगाधर महाबळे, पंचशील कांबळे ,अनिल धुतमल, सतीश निखाते, केतन खिल्लारे, निखिल महाबळे, बाळू थोरात, धोंडिबा यानभुरे, सिद्धार्थ महाबळे लखन महाबळे यासह मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# शिवसेनेच्या नायगांव तालुका प्रभारी तालुका प्रमुख पदी शिवाजी पन्नासे यांची नियुक्ती

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि.०७ एप्रिल**

नायगांव तालुक्यातील गडगा येथील शिवाजीराव नागोराव पन्नासे यांची शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेना नायगांव प्रभारी तालुका प्रमुख पदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.शिवसेना जिल्हा प्रमुखांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

शिवाजीराव नागोराव पन्नासे हे गेल्या अनेक वर्षा पासून नायगांव तालुक्यातील गडगा या सारख्या ग्रामीण भागातील सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून लोकोपयोगी उपक्रम राबविले आहेत. त्यांचा पक्ष वाढीसाठी उत्साह,कामाची पद्धत व विधानसभा मतदारसंघात ब-या पैकी जनसंपर्क आहे . पन्नासे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांचा शिवसेना पक्ष वाढीसाठी शिवसेना(शिंदे गट)या सदस्य नोंदणी अभियाना अंतर्गत कमी वेळेत दोन हजार सदस्य नोंदणी केली आहे.

आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेला अधिक मजबूत करत संघटनात्मक करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या कामां चा उत्साह पाहून वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे,धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उपनेत आमदार हेमंत पाटील यांच्या सुचनेनुसार व जिल्हा प्रमुखांच्य हस्ते शिवाजी नागोराव पन्नासे यांची शिवसेना पक्षाच्या नायगांव प्रभारी तालुका प्रमुख पदी नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला आहे. यावेळी युवा सेना जिल्हा प्रमुख ओमप्रकाश पाटील धुप्पेकर, सचिन पाटील टाकळीकरांसह आदींची यावेळी उपस्थित होती.

शिवाजीराव नागोराव पन्नासे यांची शिवसेना पक्षाच्या नायगाव तालुका प्रभारी प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, बालाजी पा. खतगांवकर, जिल्हाप्रमुख,युवा सेना जिल्हा प्रमुख ओम प्रकाश पाटील धुप्पेकर सह सर्व तालुका प्रमुख, युवा सेना जिल्हा प्रमुख सह मित्रपरिवाराने अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अंगणवाडी मदतनिससाठी २४ एप्रिलपर्यत अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०७ एप्रिल**

बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर या कार्यालयातील अंगणवाडी मदतनीसांचे रिक्त पदे सरळ नियुक्तीने भरण्यात येणार आहे. आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती याबाबत सविस्तर जाहिरात https://nanded.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी पात्र स्थानिक महिला उमेदवारांनी २४ एप्रिल २०२५ पर्यत अर्ज करावेत, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर व्हि. एस.बोराटे यांनी केले आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर या कार्यालयातील अंगणवाडी मदतनीसांचे रिक्त पदे सरळ नियुक्तीने भरण्यात येत आहेत. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत पात्र स्थानिक रहीवासी असलेल्या महिला उमेदवारांकडून ८ ते २४ एप्रिल २०२५ पर्यत विहित नमुन्यात अर्ज मागणी करण्यात येत आहे. तरी पात्र स्थानिक महिला उमेदवारांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर, हौसिंग सोसायटी, घर क्र. ११४, शासकीय विश्रामगृह ते पावडेवाडी नाका रोड, गणेश नगर, नांदेड कार्यालयात अर्ज करावेत.

# जिजाऊ रथ यात्रेचे सोनखेडमध्ये स्वागत



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०७ एप्रिल**

माँ साहेब जिजाऊ रथ यात्रेचे सोनखेडमध्ये युवक, विद्यार्थी, शेतकरी आणि व्यापारी यांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी सोनखेडचे माजी चेअरमन गंगाधर मोरे, प्रा. शिवाजी मोरे, सुरेश मोरे, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, जनार्दन देशमुख, लक्ष्मण मोरे यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

जिजाऊ रथ यात्रा भोसले गडी वेरूळ संभाजीनगर येथून निघालेली आहे. समाजामध्ये एकता निर्माण करून राष्ट्रबांधणीचे कार्य तसेच शेतकरी, विद्यार्थी, युवक यांना बदलत्या जागतिक व्यवस्थेबद्दल जनजागृतीबाबत अवगत करून नवीन व्यवस्थित दिशा याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

शिवाजी शिंदे, माधव शिंदे, बालाजी कळकेकर, संजय शास्त्री, बळीराम जाधव, सचिन पाटील, कपिल कंगुरकर, बाळू कुंटूरकर, नारायण शिंदे यांच्या यांच्यासह परिसरातील अनेक गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# वीज कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवावे : वर्कर्स फेडरेशनची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०७ एप्रिल**

नांदेड परिमंडळातील व नांदेड मंडळातील सर्व वीज कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यात यावे अशी मागणी वर्कर्स फेडरेशनचे वतीने दिनांक २७ मार्च रोजी नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता तसेच नांदेड मंडळाचे अधीक्षक अभियंता यांना व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शैलेंद्र पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली यावेळी झोनसचिव संजय टाक, माजी सहसचिव सुरेश गुंडमवार, कामगार नेते झोन प्रसिद्धीप्रमुख विजय रणखांब, मंडळ अध्यक्ष मोईनभाई शेख, मंडळ सचिव बालाजी सक्करगे पाटील, मंडळ सहसचिव शेख अहमद, सहसचिव राजु डोईजड व अन्य सभासद उपस्थित होते.

वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांमध्ये तांत्रिक अतांत्रिक कर्मचाऱ्यांचे कॉन्फर्मेशन आदेश काढण्यात यावे, चालू पगारातील इन्क्रिमेंट व ईएल अपडेट करण्यात यावी. ज्या ठिकाणी तीन यंत्र चालक आहे त्या



रिक्त ठिकाणी आऊटसोर्स यंत्र चालक देण्यात यावा. तांत्रिक व अतांत्रिक कर्मचाऱ्यांचे जिओ त्वरित काढण्यात यावे. सर्व उपकेंद्रांना इम्प्रेस देण्यात यावा. सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना सुरक्षेची साधने, टूलकिट पुरविण्यात यावे. सर्व कर्मचाऱ्यांना गणवेशाचा कपडा देण्यात यावा. जे कर्मचाऱ्यांना एका विभागामध्ये १५ वर्ष ज्यांना झाले आहे त्यांची इतर विभागात परिपत्रकानुसार बदली करण्यात यावी. प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्यांना एक वर्ष पूर्ण झाले परंतु त्यांचे कायम आदेश न काढणाऱ्या व टाळाटाळ करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा १२% भ नि नि वाटा देण्यात यावा.. मंडळ, विभाग यांच्या तक्रार निवारण बैठका नियमित तीन महिन्यात एक वेळेस घेण्यात याव्यात. मयत कामगारांचे वारसांना तातडीने कामावर घेण्यात यावे. मयत कर्मचारी वारसांची यादी सूचना फलकावर लावण्यात यावी. विनंती बदल्याची जेष्ठता यादी सूचना फलकावर लावण्यात यावी.

आउट सोर्स कामगारांचे माहे एप्रिल २४ ते सप्टेंबर २४ चा पगाराचा फरक देण्यात यावा. मंडळातील व परिमंडळातील मागण्या तातडीने सोडवण्यात याव्यात. अशी मागणी फेडरेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

# कामारीतील स्मशानभूमीच्या जागेचे अतिक्रमण काढण्यासाठी महिलांचे तहसीलमध्ये ठिय्या आंदोलन

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर , दि.०७ एप्रिल**

हिमायतनगर तालुक्यातील कामारीगावाती बौध्द व मातंग समाजाच्या स्मशानभूमी असलेल्या जागेवर अतिक्रमण केले ते अतिक्रमण काढून स्मशानभूमी ची जागा मोकळी करून देण्यासाठी येथील महिला व नागरीकांनी दि.७ रोजी तहसीलदार यांना निवेदन देऊन तहसील कार्यालयात एक तास ठिय्या आंदोलन केले आहे हिमायतनगर तालुक्यातील कामारी गावातील बौद्ध व मातंग समाजाच्या स्मशानभूमी च्या जागेत दोन व्यक्ती नी अतिक्रमण केले आहे त्यामुळे मृतकाचे अंतिम विधी करण्यासाठी जागाच नाहि त्यामुळे



एका छोट्या जागेत किंवा रस्त्याच्या कडेला अंतिम विधी करावी लागत आहे काही वेळेला जागा मिळत नसल्याने पावसाळ्यात प्रेताची विटंबना हि होत आहे या संदर्भात कामारी गावातील दोन्ही समाजातील नागरीकांनी ग्रामपंचायत पंचायत समिती, तहसील कार्यालय, जिल्हा अधिकारी कार्यालय कडे निवेदन देऊन नोंद असलेली हक्काची स्मशानभूमी ची जागा मोकळी करून देण्याची मागणी केली होती तरी अजून न्याय मिळाला नाही दि.७ रोजी हजारोंच्या संख्येने महिला व नागरीकांनी तहसीलदार यांच्या दालनात स्मशानभूमी जागा मोकळी करून देण्यासाठी एक तास भर ठिया आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले अतिक्रमण खुले न केल्यास दि.९.४.२०२५ रोजी गावातील शेकडो महिला पुरुष मंडळी तहसील कार्यालय समोर आमरण उपोषणाला बसनार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनात निलाबाई नरवाडे,सयाबाई नरवाडे, रुक्मिणी कांबळे,पंचशिला कदम,कलावती नरवाडे,शकूंतला नरवाडे,पुष्पा भवरे,सुनिताबाई कांबळे,गिरजाबाई काळे, पंचफुला कांबळे, राजाबाई नरवाडे यांच्या सह शेकडो महीलांच्या स्वाक्षरी आहेत प्रतिलिपी जिल्हाधिकारी नांदेड, मुख्यकार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पोलिस निरीक्षक हिमायतनगर आंदिना देण्यात आले आहे.

# महादेव मंदिरात लग्न व पालखी सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०७ एप्रिल**



गंगणबीड,ता.नायगांव येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री महादेव मंदिर लग्न सोहळा व पालखी सोहळा मि.चैत्र शु.११ शके १९४७ दि.८.४.२०२५ रोज मंगळवारी सायंकाळी ५ वाजता गावातून पालखी निघेल. भजन काठीकवळी सोबत हनुमान मंदिर पासून महादेव मंदिर मार्गे वाद्यांच्या गजरात श्री महादेव मंदिर येथे रात्री ८ वाजता पोहचेल. व तेथे महादेवाचा रुद्राभिषेक व महापूजा होवून रात्रौ. ९.४५ वाजता लग्न सोहळा संपन्न होईल. रात्रभर भजन, प्रवचन व शिवजागरण होईल. तसेच आसपासच्या गावातील भाविक काठीकवळी सोबत घेवून दर्शनाचा लाभ घेतात. तरी सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून लग्न सोहळा या यात्रेचा दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

# लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांकडून गुंज येथील पिडीत कुटुंबांचे सांत्वन

## जिल्हा प्रशासनाकडून आयोजित शिबीरात ९४ अर्ज प्राप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

वसमत तालुक्यातील गुंज येथे आज खासदार नागेश पाटील आष्टीकर, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांनी भेट देऊन पीडित कुटुंबाचे सांत्वन केले. तसेच त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्नाचे प्रमाणपत्र काढण्यासाठी ९४ अर्ज विशेष सहाय्यता शिबिरात भरून घेण्यात आले.

ही दुर्घटना घडल्यानंतर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी मयतांच्या वारसांना तात्काळ मदत करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले होते. त्यानुसार हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल आणि नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या आदेशानुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने अपर जिल्हाधिकारी श्री. माचेवाड आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज मयतांच्या वारसांचे पुनर्वसन करण्याकरिता विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष सहायता शिबीर आयोजित केले होते. या शिबिरामध्ये तेथील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच सामाजिक अर्थ सहाय्य, घरकुल योजना यासह विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यासाठी आवश्यक असणारे उत्पनाचे प्रमाणपत्र काढण्यासाठीचे ९४ अर्ज भरुन घेण्यात आले. हे सर्व अर्ज संध्याकाळपर्यंत ऑनलाईन करुन प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर संबंधित पीडितांना संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना या सामाजिक अर्थसहाय्याच्या योजना, घरकुल योजना यासह शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी तालुका महसूल प्रशासनाकडून धान्य व इतर साहित्याचे किट वाटप करण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार श्रीमती शारदा दळवी, गट विकास अधिकारी उमाकांत तोटावाड, नायब तहसीलदार अशोक भोजने, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता गजानन नांदे उपस्थित होते.

गुंज येथील शेतमजूर नांदेड जिल्ह्यातील आलेगाव शिवारात शेतीकामासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीतून जात असताना विहिरीत पडून सात महिलांचा मृत्यू झाला होता. राज्य शासनाने त्यांच्या मुलांची शैक्षणिक जबाबदारी घेतली असून, या शिबिराच्या माध्यमातून वारसांना विविध प्रमाणपत्रे, योजनांचा लाभ देण्यात येत आहे. मयतांच्या वारसाला राज्य शासनाकडून प्रत्येकी ५ तर केंद्र शासनाकडून २ लक्ष रुपयांची मदत जाहीर केली आहे.

# अहंकारी व्यक्ती स्वतःवर भारावून जाऊन अहित करते

## माँ कनकेश्वरी देवी यांचा श्रीराम कथेत उपदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

अहंकारी व्यक्ती स्वतःवर भारुन जाते आणि अहित करुन घेते यासाठी भक्तीची सुरक्षितता त्यागात आहे असे मार्गदर्शन महामंडळेश्वर प.पु.माँ कनकेश्वरी देवीजी यांनी श्रीराम कथेत सांगितले.

येथील दत्तमंदिर परिसरात मागील आठ दिवसापासुन श्रीराम ज्ञान यज्ञ कथा महामंडळेश्वर प.पु.माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या मधुर वाणीतुन सुरु होती. रविवार दि.६ एप्रिल रोजी माँ कनकेश्वरी देवीजी म्हणाल्या की, ज्याच्या वागण्यात राम नाही तो कोणत्याही देवतेच्या पूजेत यशस्वी होत नाही. संघटनेशिवाय संस्कृतीचे रक्षण शक्य नाही. राम हा सनातनच्या जीवनपद्धतीचा पाया आहे. संकल्पाचे देवत्व जीवन आणि मृत्यू दोन्ही दिव्य बनवते. भगवंतापासून विभक्त होण्याचे दुःख हे खरे तर रससिद्धी आहे. अधर्मात जगण्यात आनंद नाही. धार्मिकतेत मरण्यात आनंद आहे. सद्गुरुंचा आनंद काही देण्याने मिळत नाही तर शिष्याच्या नम्रता आणि नम्र वागण्यातून मिळतो. जीवनात सत्संग नसेल तर जीवन हे जीवन राहून एक भयंकर 'वन' होईल. गुरूंच्या सेवेने बुद्धीची तीक्ष्णता विकसित होते. ज्याच्याजवळ भक्ती आहे, देव त्याच्या नियंत्रणात आहे. अहंकारी व्यक्ती स्वतःवर भारावून जाते आणि अहीत करुन घेतो. भक्तीची सुरक्षितता त्यागात आहे. भक्तीचे सौंदर्य त्यागातही आहे असे माँ कनकेश्वरी देवीजी यांनी सांगितले. रविवारचे दैनंदिन यजमान डॉ.सचिन बनवारीलाल बगडिया हे होते. महाप्रसादाचे यजमान ॲड राजेश उत्तमराव गोटे, गणेशप्रसाद घनश्यामदास चौधरी हे होते. कथेनंतर उपस्थित हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# हिंगोली जिल्ह्यात १३९५६ कर्करोग संशयीत महिला आढळल्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

जिल्ह्यात महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेलय संजीवनी अभियानात तब्बल १३९५६ महिला कर्करोग संशयीत असल्याचे दिसून आले आहे. या महिलांची आरोग्य विभागाकडून तालुकास्तरावर स्क्रिनींग केली जाणार असून त्यासाठी आरोग्य विभागाने नियोजन केले आहे.

जिल्ह्यात महिलांच्या आरोग्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अभिवन गोयल यांनी संजीवनी अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. या अभियानासाठी आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन या अभियानात नेमके काय काराचे याची माहीती दिली. त्यानंतर आशा कर्मचाऱ्यांमार्फत गावपातळीवर महिलांची माहीती घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गणेश फोपसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ सतीश रूणवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनापासून गाव पातळीवर महिलांच्या भेटी घेऊन त्यांची आरोग्य तपासणी तसेच आरोग्य विषयक माहीती घेतली. यामध्ये कर्करोग संशयीत महिलांची माहीती घेण्यात आली आहे. दि २७ मार्च पर्यंत चाललेल्या या सर्वेक्षणात तब्बल ३ लाखापेक्षा अधिक महिलांची माहीती घेण्यात आली आहे.

या तपासणीचा अहवाल तयार करण्यात आला असून यामध्ये तब्बल १३९५६ महिलांना संशयीत कर्करोग असल्याचे दिसून आले. या प्रकारामुळे हादरून गेलेल्या आरोग्य विभागाने तालुकास्तरावर तपासणी शिबीर घेण्याची तयारी सुरू केली आहे. यामध्ये तालुकास्तराव महिलांची स्क्रिनींग केली जाणार असून त्यातून कर्करोग आढळून आलेल्या महिलांची माहीती घेतली जाणार आहे. आता या शिबीरातून किती महिलांमध्ये कर्करोगाचे निदान होते याकडे आरोग्य विभागाचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यात आरोग्य तपासणीमध्ये ३७३३ महिला संशयीत तोंडाचा कर्करोग असल्याचे दिसून आले आहे. ७५२४ महिलांमध्ये गर्भाशय संशयीत कर्करोग आढळून आला आहे. तर २६९९ महिलांमध्ये स्तनाचा संशयीत कर्करोग आढळून आला आहे. आता स्क्रिनींग नंतरच कर्करोगाचे निदान होणार आहे. यासाठी आरोग्य विभागाच्यावतीने तालुकास्तराव शिबीरे घेण्यासाठी विभाग सज्ज झाला असल्याचे समजते.



**हिंगोली– येथील प्राचीन खाकीबाबा मठात श्रीराम नवमीनिमित्त श्रीरामाचा रथ ओढण्याची परंपरा आहे. रविवारी सायंकाळी येथील रथ ओढण्यासाठी मोठ्या संख्येने रामभक्त तसेच भाविक यांनी गर्दी केली होती. रथोत्सव [illegible] संख्येने नागरिकही उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

# राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने तीन दिवशीय सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**



येथील नवा मोंढा भागात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने सोमवारी ७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सदस्य नोंदणीचा शुभारंभ राष्ट्रवादीचे युवक प्रदेश उपाध्यक्ष बालाजीराव घुगे यांच्या नेतृत्वात करण्यात आला. ही नोंदणी ७ एप्रिल ते ९ एप्रिल पर्यंत चालणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना राष्ट्रवादीचे युवक प्रदेश उपाध्यक्ष बालाजीराव घुगे म्हणाले की येणाऱ्या काळात महायुती तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने सुरू केलेल्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे, संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग व युवक शेतकरी इत्यादी बांधवाचे प्रश्न सोडवणार आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादीचे संघटन मजबुत करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभेत सदस्य नोंदणी बूथ सर्कल तालुका यासह जिल्ह्याभरात जास्तीत जास्त शाखा करण्यासाठी व गाव तिथे राष्ट्रवादीची शाखा व घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता निर्माण करणार आहे व युवकांना जास्तीत जास्त पक्षात आणून त्यांच्या अडी अडचणी सोडवणार असल्याचे राष्ट्रवादीचे युवक प्रदेश उपाध्यक्ष बालाजीराव घुगे यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष देविदास गाडे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण मेड, जिल्हा उपाध्यक्ष पंकज बांगर, मनोज बांगर, किशनराव जुमडे सुभाष जाधव, राम दुर्ग प्रवीण सांगळे कुणाल सुरुसे, अमोल गंगावणे संतोष उबाळे, रवी घुगे, गणेश बांगर, सचिन बांगर, अंजर तांबोळी अनिकेत बांगर, कृष्णा घुगे, बद्री बांगर, गणपत बांगर, अतुल गंगावणे, सय्यद सलीम वल्लभ मुसळे, शेख अलीम सय्यद सलीम तसेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

या तीन दिवसीय नोंदणी शिबिराचे आयोजन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बालाजीराव घुगे यांनी केले होते.

# वसतीगृहाचे उद्घाटन करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

शहरातील जिल्हा परिषद मैदानावर केंद्र शासनाचे वर्ग ८ ते ११ वीच्या मुलींसाठी केंद्र शासनाचे कस्तुरबा गांधी मुलींच्या वसतीगृहाची इमारत सन २०१९ मध्ये बांधली आहे. या इमारतीमध्ये अनुसूचीत जाती, जमाती तसेच भटक्या व विमुक्त, मागास प्रवर्गातील २०० विद्यार्थ्यांनीकरिता राहण्याची व जेवणाची सुविधा असलेली सुसज्ज इमारत आहे. परंतु या इमारतीचे उद्घाटन अजूनही झाले नाही. सदरील इमारतीचे उद्घाटन नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी करण्यात यावे अशी मागणी भीमशक्तीचे युवा जिल्हाध्यक्ष विशाल इंगोले, माजी नगरसेवक मिलींद उबाळे, शंकर पोघे, हारूण पठाण यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या सर्व वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसवावेत- कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

हिंगोली जिल्ह्यातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या आहेत. याशिवाय मुलींच्या सुरक्षिततेकडे शाळांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

हिंगोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या उपस्थितीमध्ये स्कुल बस सुरक्षा समितीची बैठक झाली. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, मोटार वाहन निरीक्षक जगदीश माने यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच शाळा प्रशासनाचे अधिकारी, संस्थाचालक, मुख्याध्यापक उपस्थित होते.

यावेळी पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील सर्वच शाळांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लक्ष द्यावे. स्कुलबस चालक व मालक तसेच शाळा व्यवस्थापनांनी शाळेत मुलांची ने-आण करणारी बस व इतर वाहने मुलांकरीता सुरक्षित राहतील याची खबरदारी शाळेने घ्यावी. प्रत्येक बस व इतर वाहनात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत अशा सूचना यावेळी कोकाटे यांनी दिल्या. या सोबतच शाळेच्या बसमध्ये सहा वर्षाखालील मुलांना ने-आण करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच मुली असणाऱ्या शाळांतील वाहनांमध्ये महिला कर्मचारी बंधनकारक आहेत. स्कुलबस चालक व वाहक, मदतनीसांची पोलिस विभागाकडून चारित्र्य पडताळणी करून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

याशिवाय मुलांच्या सुरक्षेसाठी शाळांमार्फत ॲप तयार करून त्यामध्ये जीपीएस बसवावेत. मुले घरातून निघून शाळेत व घरी सुरक्षित पोहोचल्याची नोंद पालक करू शकतील. शाळा प्रशासन व पालक हे मुलांच्या सुरक्षिततेबद्दल जागरूक राहू शकतील. यामुळे मुले कोणत्याही कारणास्तव शाळेत पोचली नाहीत किंवा घरी पोहोचली नाही तर सूचना, अलर्ट देवून लगेच त्याला शोधण्याची कार्यवाही सुरू करता येईल असेही यावेळी कोकाटे यांनी सांगितले.

# ॲड रवी शिंदे यांचे अन्नत्याग आंदोलन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

कळमनुरी पोलिसांनी दाखल केलेला अदखलपात्र खोटा गुन्हा मागे घेण्यासाठी तसेच पोलिस निरीक्षकासह अधिकारी, कर्मचारी यांनी अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे त्यांना निलंबीत करण्यात यावे या मागणीसाठी वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड रवी शिंदे यांनी सोमवारपासून येथील पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. उमरा येथील एका खुन प्रकरणी तक्रारदारासोबत कळमनुरी पोलिस ठाण्यात ॲड रवी शिंदे गेले असता त्यांना पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सपोनि रघुनाथ शेवाळे, हनुंमत भिंगारे यांनी गैरवर्तणुक केली तसेच ॲड शिंदे यांच्यावर खोटा अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. या विरोधात ॲड शिंदे यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

# दराडे विद्यालयाचे चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**



येथील भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी रंगोत्सव सेलिब्रेशन फॉर इंटरनॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन २०२५ मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. वनराज चिलगर यांनी इंटरनॅशनल लेव्हल वरती स्केचिंग स्पर्धेमध्ये द्वितीय बक्षीस मिळविले. कल्याणी सांगळे कलरिंग स्पर्धेमध्ये द क्रिएटिव्ह आर्टिस्ट अवॉर्ड, स्वप्निल जाधव स्केचिंग स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल ट्रॉफी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, समृद्धी बासटवार कलरिंग मध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, सृष्टी वायचाळ कलरिंग मध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, श्रुती पडोळे हॅन्ड रायटिंगमध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, अदिती चिलमुल कार्टून मेकिंग मध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, स्वरा डुब्बेवार कलरिंग मध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, अद्विका धुमाळ कलरिंगमध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र, समीक्षा नरवाडे ग्रीटिंग कार्ड मेकिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, अद्वैत धुमाळ कलरिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, शुभांगी पौळ हॅन्ड रायटिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, प्रतिकेश पंडित स्केचिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, पल्लवी बगाटे स्केचिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, दिव्या उबाळे कलरिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, आराध्या जारे हॅन्ड रायटिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, श्रावणी शेळके कलरिंगमध्ये मेडल व प्रमाणपत्र, आदर्श महाजन कॅरिकेचर मध्ये मेडल व प्रमाणपत्र, श्रद्धा जोगदंडे कलरिंग मध्ये मेडल व प्रमाणपत्र, कनिष्का चोंढेकर कलरिंग मध्ये सुपर गिफ्ट व प्रमाणपत्र, जान्हवी वडकुते हॅन्ड रायटिंग मध्ये सुपर गिफ्ट व प्रमाणपत्र, देवांश चोंढेकर स्केचिंग मध्ये सुपर गिफ्ट व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कलाध्यापक रवींद्र जांभळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व परीक्षा समन्वयक म्हणून कार्य केले. तसेच याकरिता अध्यापक प्रवीण राऊत व शिवाजी वडकुते यांनीही मोलाचे सहकार्य केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक डॉ. प्रकाश स.अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, पर्यवेक्षक तुलसीदास चीलमुल यांनी केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक अध्यापक यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सावरखेडा जि प शाळेतर्फे ग्रामपंचातीत चावडी वाचन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**

तालुक्यातील सावरखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ी निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत ग्राम पंचायत कार्यालय सावरखेडा येथे चावडी वाचन घेण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरखेडा यांच्या वतीने निपुण महाराष्ट्र कार्यक्रमा अंतर्गत ग्राम पंचायत कार्यालय सावरखेडा येथे चावडी वाचन कार्यक्रम घेण्यात आला या

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.सरस्वती हरण तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ गोदावरीबाई हरण, श्री पांडूरंग हरण, व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक कैलास धनवे, शिक्षक सुभाष कोटकर, श्रीमती चौधरी ताई, श्रीमती अनुसया देशमुख ताई उपस्थित होते.

यावेळी मुखाधापक धनवे यांनी निपूण महाराष्ट्र कार्यक्रम बाबत व शाळेच्या गुणवत्तेबात माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांचे वाचन घेण्यात आले तसेच विद्यार्थ्यांकडून गणित सोडवून घेण्यात आले. संख्या वाचन, गणन घेण्यात आले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करून समाधान व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थांनी शाळेला मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ग्रामस्थांच्यावतीने विद्यार्थांना खावू वाटप करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.